संस्थापक: राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादक: महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 11 | Marathi Monthly | Thane, 1 May 2025 to 31 May 2025 | Pages 16 | Price : 10/-

# उरी, पुलवामा व आता पेहेलगाम... सर्जिकल-स्ट्राईकरूपी, लांडगा आला रे आला!

गेल्या ३ वर्षात १ लाख ८० हजार कायम लष्करी-जवान भरतीच केले गेले नाहीत. त्या जागी तुटपुंज्या पगाराचे 'अग्निवीर' नावाचे अर्धप्रशिक्षित नवतरुण 'कंत्राटी-गुलाम' म्हणून भरती केले गेले. ...परिणामत:, दोन हजारांहून अधिक पर्यटक असलेल्या पेहेलगामसारख्या ठिकाणी सुरक्षा-व्यवस्थाच मौजूद नव्हती. एवढंच नव्हे, तर अनेक जाणकार लष्करी-तज्ज्ञांच्या मते जसे आपण कायम लष्करी जवानांच्या जागी अग्निवीर-गुलाम आणले.

...पृष्ठ क्र. २ वर




२०१६चा काश्मीर 'उरी' येथील दहशतवादी हल्ल्यानंतरचा (ज्यात, आपले १९ जवान मारले गेले होते) किंवा २०१९चा बालाकोटमधील पुलवामा-हत्याकांडानंतरचा (ज्यात, ४७ CRPF जवान सरकारी बेपर्वाईने मारले गेले) असे दोन्ही 'सर्जिकल-स्ट्राईक्स'...ही केवळ, राजकीय फायदा उठवण्यासाठी म्हणून, मोठ्या लष्करी-कारवाईची उत्तमरित्या वठवलेली सोंगं (Pretence of War for Political Benefit) होती.

## नेमेची येतो १ मे रोजी, तो कामगार व महाराष्ट्र दिन....

हीनदीन झालेल्या मायमराठ्यांना, शिवछत्रपतींच्या राजनितीचं आश्वासन देणारा, कामगारदिनाचा आणि महाराष्ट्रदिनाचा खास 'धर्मराज्य-सलाम'!


....राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

...पृष्ठ क्र. १० वर

अंतरंग




भाजपाईची राजकीय - नीतिमत्ता शून्यात... भारतीय -अध्यात्माची 'संघीय' चिरफाड! ...राजन राजे
पृष्ठ क्र. ५



दीनानाथ हे या मोठ्या आजाराचे छोटे लक्षण आहे
- हेरंब कुलकर्णी
पृष्ठ क्र. १०



बाबासाहेब सम जून घेताना,,,,
...संजीव चांदोरकर
पृष्ठ क्र. ९

चीनकडून बरेच काही शिकण्यासारखे....
...संजीव चांदोरकर
पृष्ठ क्र. १६

# ...सर्जिकल-स्ट्राईकरुपी, लांडगा आला रे आला!

...पृष्ठ क्र. १ वरुन

**२०१६मध्ये आज परराष्ट्र मंत्री असलेले जयशंकरजी जेव्हा परराष्ट्र-सचिव होते...तेव्हा, उरी हल्ल्यानंतरच्या सर्जिकल-स्ट्राईकविषयी संसदेच्या परराष्ट्र-व्यवहार समितीसमोर (PCE) कबुलीजबाब देताना म्हणाले होते की, ती कुठली लष्करी कारवाई नसून दहशतवाद-विरोधी एक सामान्य मोहिम होती... तर, दुसऱ्या बाजुला तेव्हाचे डायरेक्टर जनरल मिलिटरी ऑपरेशन्स लेफ्टनंट जनरल रणवीरसिंग दुसऱ्याच दिवशी पत्रकार-परिषदेत म्हणाले होते की, या 'सर्जिकल स्ट्राईक'ची आम्ही पाकिस्तानला पूर्वकल्पना दिलेली होती व त्याबाबत पाकिस्तानशी समन्वय राखला गेला होता.**

...लक्षात घ्या की, कुठलीही लष्करी कारवाई, ही शत्रूराष्ट्राला कल्पना देऊन वा त्याच्याशी समन्वय राखून होत नसते, हे वैश्विक-सत्य होय!

...तसेच, आजवर केंद्र सरकारतर्फे २०१९च्या बालाकोट सर्जिकल-स्ट्राईकबाबत, पाकिस्तानच्या करण्यात आलेल्या नुकसानीचा पाहणी-अहवाल (Damage ssessment Report) जाहीर करण्यात आलेला नाही...विशेष बाब म्हणजे, भारताच्या 'बालाकोट' सर्जिकल-स्ट्राईकनंतर दुसऱ्याच दिवशी; म्हणजे, २७ फेब्रुवारी-२०१९मध्ये पाकिस्तानी हवाईदलाने प्रतिशोधाच्या रुपाने ऑपरेशन 'स्विफ्ट-रेटॉर्ट' करत जम्मू-काश्मीरच्या भारतीय भूभागावर बॉम्बफेक केली होती (पाकिस्तानचे हे कृत्य म्हणजे, एक युद्धसदृश पाऊलंच होतं, हे भारतीय हवाईदलाने तेव्हा मान्यही केलं होतं)...पण, भाजप-संघीय सरकारने त्यावर पुढे कुठलीच प्रतिक्रियात्मक लष्करी-कारवाई करण्याची हिंमत दाखवली नव्हती...हीच तर खरी 'ग्यानबाची मेख' आहे, या सगळ्याच सर्जिकल-स्ट्राईक प्रकरणातील!

**गेली काही वर्षे आम्ही लष्करी-सज्जतेकडे पुरेसं लक्ष देण्याऐवजी २ हजार कोटींची अयोध्येतील 'राममंदिर' उभारणी, अनावश्यक असा संसद-भवन वगैरेच्या नवनिर्माणाचा २० हजार कोटींचा 'सेंट्रल व्हिस्टा-प्रकल्प' आणि देशाच्या तमाम सगळ्याच संसाधनाचा ताबा (उदा. विमानतळं, बंदरे, खाण-प्रकल्प, रेल्वे, महामार्ग, पूल-उड्डाणपूल, इतर कॉर्पोरेटीय क्षेत्रे वगैरे वगैरे) सत्ताधाऱ्यांच्या अंबानी-अदानीसारख्या खासम खास बड्या भांडवली-दुढ्ढाचार्यांकडे जाऊन देशाची बेलगाम 'खाजगी-लूट' कशी होत राहील...यासारख्या बाबींकडेच आमचं लक्ष केंद्रित केलं!**

त्यातून, पगार-निवृत्तीवेतनाचा मोठा पैसा वाचावा म्हणून, **गेल्या ३ वर्षात १ लाख ८० हजार कायम लष्करीजवान भरतीच केले गेले नाहीत. त्या जागी तुटपुंज्या पगाराचे 'अग्निवीर' नावाचे अर्धप्रशिक्षित नवतरुण 'कंत्राटी-गुलाम' म्हणून भरती केले गेले. ...परिणामतः, दोन हजाराहून अधिक पर्यटक असलेल्या पेहेलगामसारख्या ठिकाणी सुरक्षा-व्यवस्थाच मौजूद नव्हती. एवढंच नव्हे, तर अनेक जाणकार लष्करी-तज्ज्ञांच्या मते जसे आपण कायम लष्करी जवानांच्या जागी अग्निवीर-गुलाम आणले; तसेच, प्रत्यक्ष लष्करी-कारवाईच्या जागी उठसूठ सर्जिकल-स्ट्राईक, हा उफराटा प्रकार आपण आणलाय.** आपली सगळी लष्करी-सज्जताच त्याप्रकारची असल्याने, पाकिस्तान-चीनशी रशिया-युक्रेनसारखं दीर्घकालीन पारंपरिक युद्ध करण्याच्या आपल्या क्षमतेवर मोठ्या मर्यादा आल्यात!

...या पार्श्वभूमीवर आपण हे विचारात घेतलं पाहिजे की, लांडगा आला रे आला अशी हाकाटी फारतर दोन वेळा देता येते...त्यानंतर, तिचा प्रभाव संपतो. तशीच, सर्जिकल स्ट्राईकद्वारे निवडणुकीत मतं मिळवण्यासाठी लष्करी-कारवाईची वठवली गेलेली 'शिमग्याची सोंगं' वारंवार उठवता येणं, अशक्य दिसत असल्यानं...दबावाखाली आलेले भाजप-संघीय राज्यकर्ते आता, 'आखरी-रास्ता' म्हणून 'धर्मा'च्या नावाने हाकाटी पिटणारच, हे सूर्यप्रकाशासारखं स्वच्छ दिसू लागलंय. सध्या पेहेलगाम घटनेनिमित्ताने बिनडोक-निर्बुद्ध व धर्मविद्वेषी अंधभक्तांना भाजप-संघीय नेतृत्त्वाकडून, भारताला 'हिंदुराष्ट्र' घोषित करण्याच्या व्यक्तिगतस्तरावर असंख्य ऑनलाईन-मोहिमा राबवण्याचा आदेश दिला गेल्याचं समजतंय.

...त्या आदेशानुसार, हे 'अंधभक्त मर्कट', तत्काळ कामाला लागल्याचं समस्त भारतीय जनतेच्या दृष्टोत्पत्तीस येईलच, तेव्हा सावध रहा...धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## एका पहलगाम घटनेवर, संपूर्ण भारतात चर्चा करायला लावून, मोदी-अमित शहा, भाजपा व संघाने काय प्राप्त केले?



१. महाराष्ट्र निवडणूक घोटाळ्यातील ६४ लाख ज्यादा मतदार कुठून आले, याची चर्चा थांबली.

२. दिल्ली व हरियाणा येथील निवडणूक घोटाळ्यातील चर्चा थांबली.

३. निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यावरील कारवाईची मागणी थांबली.

४. बिहार निवडणुकीत, नितीश कुमार यांना होणारा विरोध थांबला.

५. भाजपाचे केंद्रातील मुख्य साथी, चंद्रबाबू नायडू यांनी वक्फ बोर्डविरोधी बिलाला केलेला विरोध लपला गेला.

६. सुप्रीम कोर्टाने वक्फ बिलविरोधात भूमिका घेऊन, मोदी-शहा यांना झापले, याची चर्चा थांबली.

७. महाराष्ट्रातील शाळांत, पहिलीपासून हिंदी अनिवार्य, याला होत असलेला विरोध लपवला गेला.

८. लाडकी बहीण योजनेतील, कित्येक बहिणींचा पैसा थांबवला आणि कित्येक बहिणींचा पैसा कमी केला, हे कोणाला कळूच दिले नाही.

९. पश्चिम बंगालमध्ये दंगल घडविण्यासाठी गेलेले, मुस्लिम वेषातील संघाचे हिंदू कार्यकर्ते पकडले गेले, यावर चर्चा थांबली.

१०. अमेरिकेने भारतीयांना हातात व पायात हातकड्या बांधून परत पाठवले, त्यामुळे जगासमोर गेलेली इज्जत झाकता आली.

११. ऑस्ट्रेलियासह ७ देशांनी, अदानीविरुद्ध फसवणूकीची, आंतरराष्ट्रीय न्यायालयात सुरु झालेली चौकशी झाकली गेली.

१२. सगळ्यात महत्त्वाचे, महाराष्ट्र ED कार्यालयात ऑफिसला आग लावून, अनेक पापी-भ्रष्टाचारी नेत्यांना पापमुक्त केले.

१३. जनसुरक्षा बिल, जे महाराष्ट्रातील जनतेच्या स्वातंत्र्याविरोधात आहे, त्यावरील चर्चा थांबली.

१४. अजून अनेक मुद्दे आहेत किंवा असतील, जे काही कालावधीनंतर बाहेर येतील...

# जनसुरक्षा कायदा म्हणजे, व्यक्तिस्वातंत्र्याच्या घटनात्मक अधिकाराची गळचेपी!

## केंद्र सरकारपुरस्कृत, काळ्या कामगार कायद्याच्या निषेधार्थ, महाराष्ट्र राज्य कामगार–कर्मचारी संयुक्त कृती समितीचा ठाण्यात यल्गार...




ठाणे (प्रतिनिधी) : केंद्र सरकारने सध्याचे कामगार कायदे बदलून, चार आचारसंहिता लादण्याचा निर्णय घेतलेला आहे. या कायद्याने कंत्राटी–कामगारपद्धत व ‘फिक्स्ड टर्म कॉन्ट्रॅक्ट’ला अनिर्बंध परवानगी दिलेली आहे. ले–ऑफ, कामगार–कपात, कारखाने बंद करण्यास मुक्त परवानगी दिलेली आहे. या कायद्यामुळे कामगारांना संप व आंदोलने करता येणार नाहीत, तसे केल्यास जबर शिक्षेची तरतूद करण्यात आलीय. कामगार संघटना व कामगार चळवळ मोडून काढण्यासाठी, हा कायदा तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारने ‘‘जनसुरक्षा अधिनियम–२०२४’’ हा कायदा प्रस्तावित केला असून, या कायद्यामुळे संप, मोर्चे, निदर्शने, आंदोलने हे लोकशाहीने दिलेले अधिकार बेकायदेशीर समजून, त्यांच्यावर बंदी घालण्याचा अधिकार; तसेच, संघटनांच्या प्रमुखांना तुरुंगात टाकण्याचा अधिकार कायद्याने दिलेला आहे. हे अन्यायी कायदे अस्तित्वात आल्यास, कामगार व जन–संघटनांना कोणतीही चळवळ करता येणार नाही. म्हणूनच, हे कायदे अस्तित्वात येऊ नयेत या मागणीसाठी, ‘महाराष्ट्र राज्य कामगार–कर्मचारी संयुक्त कृती समिती’च्या वतीने मंगळवार, दि. २२ एप्रिल–२०२५ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कामगार व जन–संघटनांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. आंदोलनाच्या या कार्यक्रमाला ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कामगारनेते राजन राजे यांनी उपस्थित राहून, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनावर एकच शरसंधान साधले. यावेळी उपस्थित असणाऱ्या डाव्या संघटनांच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना राजन राजे म्हणाले की, आजची जी निदर्शने आपण करीत आहात, ती केंद्र सरकारपुरस्कृत, महाराष्ट्र विधानसभेत मंजूर झालेली काळी संहिता असून, त्याविरोधातच हा यल्गार आहे. केंद्र सरकारने जे, ‘डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल’ (DPDPB) आणलंय, ते माणूसपणाचे हक्क हिरावून घेणारे आहे. तुम्ही जनआंदोलनं करायची नाहीत. याचाच अर्थ, जनतेच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा जो घटनात्मक अधिकार आहे, त्याची पूर्णतः गळचेपी करायची. एका बाजूला देवेंद्र फडणवीसांपासून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांपर्यंत सगळे सांगतायेत की, महाराष्ट्रातला नक्षलवाद आम्ही संपुष्टात आणलेला असून, जेमतेम एकदोन जिल्ह्यांत त्याची शेवटची हालचाल शिल्लक आहे, असं बोलायचं आणि नक्षलवादाच्या नावाखाली, जनतेच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या व भाषण स्वातंत्र्याच्या मुलभूत हक्कांची सरळसरळ पायमल्ली करायची. आम्ही अनेक वकिलांशी बोलल्यानंतर आम्हाला हे कळलं की, या संपूर्ण विधेयकात कुठेही ‘नक्षलवाद–संघटना’ असा उल्लेख नाहीये. **संघटना म्हणजे, तुम्ही आम्ही**



**नागरी-चळवळ करणारे. अशा कोणावरही महाराष्ट्राचं सरकार, त्यांना वॉरंटशिवाय अटक करु शकतं. काळ्या कामगार-संहितेत हेच आहे. जर एखादी कामगार संघटना, आपल्या कामगारांच्या हक्कांसाठी आंदोलन करीत असेल आणि जर ते कुठल्याही तांत्रिक दोषामुळे चुकीचं असेल; तर, ती कामगार संघटना कायमची व्यवहारातून बाद करण्याची अनुमती ही कामगार-संहिता देते. थोडक्यात, ही काळी कामगार-संहिता म्हणजे, कामगारांवर कोसळलेला केवळ वरवंटाच नसून, कामगार-चळवळीची वाजणारी ती मृत्युघंटादेखील असल्याचे, राजन राजे यांनी स्पष्टपणे नमूद केले.** यावेळी आपल्या रोखठोक शैलीत बोलताना ते पुढे म्हणाले की, या जनसुरक्षा कायद्यात जो कोणी आंदोलन करेल, मग ती व्यक्ती असो, संघटना असो, ज्यांच्यापासून या राज्य शासनाला धोका संभवतो, त्यांना कोणालाही बेकायदेशीर ठरवून, त्यांच्यावर बंदी घालणं, त्यांना विना वॉरंट अटक करणं, या तऱ्हेचे अमर्याद लोकशाहीविरोधी अधिकार मिळतात. रामायणात रमणारे, राममंदिर बांधणारे हे, भाजप-संघीय हिंदुत्ववादी लोक आहेत. त्यांना मला इथे एक प्रश्न विचारायचाय, ज्यावेळेला एका सामान्य घरातल्या धोब्याने सितेविषयी शंका उपस्थित केली, त्यावेळेला त्या धोब्याला अटक केली गेली का? त्या धोब्याच्या घरावर रामाने बुलडोझर फिरवला का? एखाद्या संघटनेवर नुसतीच बंदी घालून हे थांबणार नाहीये; तर, तुम्ही आम्ही चारपाच भावंडं आहोत आणि त्यातल्या एकाचा जरी त्यांना नक्षलवादी असल्याचा संशय आला किंवा सरकारला धोकादायक असल्याचं मत बनलं; तर, ज्या घरात बैठक झालीय, ते संपूर्ण घरच, बुलडोझरने पाडण्याची परवानगी, योगी आदित्यनाथनीतीचा हा कायदा त्यांना देतो. छत्तीसगढ, ओरिसा, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या राज्यांत तर, अत्यंत वाईट पद्धतीने या कायद्याचा वापर झालाय. आजच एक बातमी आलीय, कर्नाटकमधील निवृत्त पोलीस महासंचालक असलेल्या ओमप्रकाश नावाच्या अधिकाऱ्याची, त्याच्या बायकोने हत्या केलीय. एवढा मोठा आयपीएस दर्जाचा अधिकारी, त्याची पत्नीच त्याची हत्या करते. हत्या करताना ती कुठल्या टोकाला पोहोचली असेल? हत्या करणं याला कोणी चांगलं म्हणणार नाही, पण हत्या करताना ती बोलते काय? ''एका राक्षसाला मी संपवला'' म्हणजे, तिने काय काय सहन केलं असेल, याची आपण कल्पना करु शकता. सगळेच आयपीएस-आयएएस अधिकारी असे नसतात, चांगले अधिकारीही असतात. मात्र, हल्ली अशातऱ्हेची मनोवृत्तीची माणसं, देशात लोकशाहीविरोधी राजवट आल्यापासून, प्रशासकीय सेवेत उन्मत्त झालेली दिसतायेत... आणि म्हणून, जनतेने स्वतःच्या हक्कांसाठी अत्यंत जागृत राहणं गरजेचं आहे. जनसुरक्षा कायद्यात, काळ्या कामगार-संहितेत आम्हाला कुठलीही सुधारणा नको; तर, या कायद्याचंच मुळापासून उच्चाटन झाले पाहिजे. संपूर्ण श्रमिकवर्गाने, विशेषतः महाराष्ट्रातल्या मराठी माणसांनी, प्राधान्याने हे लक्षात घेतलं पाहिजे की, भूमिपुत्र असणारा मराठी माणूस, आज मुंबई-महाराष्ट्रातून उध्वस्त होतोय. महाराष्ट्रातील मराठी माणूस ८० टक्के श्रमिक आहे. तो कोणी जमीनदार नाही, उद्योगपती किंवा भांडवलदार नाहीये. या भांडवली व्यवस्थेतल्या तळागाळातील हा पिडीतवर्ग आहे, जो ८० ते ९० टक्के कंत्राटी-कामगार आहे... आणि म्हणूनच मी, आमदार जितेंद्र आव्हाडांसमोर बोललो. कारण, ही मंडळी बोलणार नाहीत. बोलण्याचं काम तुमचं-आमचं श्रमिकांचं आहे. **ज्या कंत्राटी-कामगारपद्धतीने, सामान्य माणसाला गुलाम आणि नवअस्पृश्य बनवलं, त्याची जी पुढची पिढी आहे, ती सूर्याची नव्हेत; तर कृष्णविवराची पिल्लं आहेत, हे लक्षात घ्या. म्हणूनच, हा मूळ रोग आपल्याला उलटं फिरुन नष्ट केलाच पाहिजे. जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधातील आणि काळ्या कामगार संहितेविरोधातील, आजचं जे आंदोलन या डाव्या संघटनांनी पुकारलंय, त्याला मी मनापासून धन्यवाद देतो. आता सगळ्या डाव्या कामगार संघटनांना, डाव्या पक्षांना आणि आमच्यासारख्या समविचारी पक्षांना यापुढे झोपून चालणार नाही, आराम करुन चालणार नाही. आपल्याला रस्तोरस्ती आंदोलन उभारावे लागेल. जनता आता रस्त्यावर उतरली पाहिजे.** कारण, निवडणुका आता 'ईव्हीएम'च्या मार्गाने जिंकता येऊ लागल्यात. निवडणूकपूर्व आणि निवडणुकपश्चात, ज्यापद्धतीने जी हेराफेरी झालीय, त्यापद्धतीने निवडणुका जिंकता येतात. इलेक्ट्रोल बॉण्डच्या माध्यमातून, पीएम केअर फंडाच्या पैशातून आणि नोटबंदीच्या माध्यमातून, काळ्यापैशाने निवडणुका जिंकता येतात, हे आता सिद्ध झालेय. लोकशाहीचे सगळे मार्ग आता खुंटत चाललेत, त्यामुळे जनतेला आपला आवाज उठविण्यासाठी, या जागृत महाराष्ट्राला, हा जनसुरक्षा कायदा आणि ही काळी कामगार संहिता संपविण्यासाठी, रस्तोरस्ती उतरण्याचा निर्धार करावाच लागेल! अशा शब्दांत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, उपस्थितांमध्ये स्फुल्लिंग चेतविले. याप्रसंगी पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर, पक्षाचे सहसचिव नरेंद्र पंडित आदी मान्यवरांसह, 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते आणि कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते.




**“ निवडणुका आता 'ईव्हीएम'च्या मार्गाने जिंकता येऊ लागल्यात. निवडणूकपूर्व आणि निवडणुकपश्चात, ज्यापद्धतीने जी हेराफेरी झालीय, त्यापद्धतीने निवडणुका जिंकता येतात. इलेक्ट्रोल बॉण्डच्या माध्यमातून, पीएम केअर फंडाच्या पैशातून आणि नोटबंदीच्या माध्यमातून, काळ्यापैशाने निवडणुका जिंकता येतात, हे आता सिद्ध झालेय. लोकशाहीचे सगळे मार्ग आता खुंटत चाललेत, त्यामुळे जनतेला आपला आवाज उठविण्यासाठी, या जागृत महाराष्ट्राला, हा जनसुरक्षा कायदा आणि ही काळी कामगार संहिता संपविण्यासाठी, रस्तोरस्ती उतरण्याचा निर्धार करावाच लागेल! ”**

**''जगा, जगवा आणि जगू द्या'', ही त्रिसूत्री 'भांडवली-जगत' धुडकावून लावत ''जीवो जीवस्य जीवनम्'', ही जगण्याच्या उतरंडीच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक असलेली नैसर्गिक-क्रौर्याची मर्यादा देखील उल्लंघून क्रौर्यपूर्ण नंगानाचाचे नवे उंचच उंच मिनार रचत जाते...जीवन सदा मु लणं-फळण्यासाठी निसर्गतः अटळ असलेली 'शोषणा'ची (गर्भात वाढणारा जीव, जसा मातेच्या रक्तातूनच अन्नद्रव्याचं 'शोषण' करत वाढतो) स्वाभाविक मर्यादा...वेड्यावाकड्या पद्धतीने व अपरिमित मात्रेत उल्लंघणं, हे भांडवली-व्यवस्थेचं पायाभूत सूत्रच बनतं. त्या नृशंस-शोषक व्यवहारावरच भांडवली-संरचनेची दिमाखदार, झळाळती इमारत उभी असते! मनुष्यजातीसह सर्वच प्राणिमात्रांच्या नैसर्गिक अधिवासावर आक्रमण-संक्रमण होत जातं आणि पहाता पहाता जीवनविरोधी संरचना उभी रहात जाते!**

# भारतीय -अध्यात्माची ‘संघीय’ चिरफाड!

**भाजप-संघाच्या कडव्या धर्मप्रचाराची राळ, विषासारखी कशी समाजपुरुषात हळूहळू भिनायला लागलीय आणि अज्ञानी व महामूर्ख बहुजन कसे त्याला सहजी बळी पडत जातायत...ते ‘रामराम’ वा ‘जय सितारामा’चं, ‘जय श्रीराम’ आणि आता तर, ‘रामनवमी’चं ‘श्रीरामनवमी’ व्हायला लागलेलं पाहून धक्काच बसला *(अर्थातच, कडवा धर्मप्रचार...ही बाब मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख वगैरे सगळ्याच विखारी-धर्मप्रचारकांना वेगवेगळ्या प्रकारे लागू आहेच; पण, आपण ‘हिंदू’ म्हणवल्या जाणाऱ्या भारतीय-आध्यात्मिक जीवनशैलीतले असल्याने, त्याबद्दलच प्रामुख्यानं बोलणं ओघानेच आलं)!***




राम काय कृष्ण काय, बुद्ध काय किंवा नानक काय...हे सारेच भारताच्या अंतरी वसतात. भारताचं ते केवळ वरवरचं ‘धार्मिक’ अधिष्ठान नसून ते अंतःकरणात अगदी खोलवर झिरपलेलं ‘आत्मिक’ अधिष्ठान आहे! अशा प्रत्येक व्यक्तित्वातलं आपल्याला झेपेल तेवढं, रुचेल तेवढं प्रत्येक भारतीय पिढ्यानपिढ्या घेत असतो आणि पुढेही घेत राहील...त्यातूनच, कळत-नकळत आपलं व्यक्तित्व घडत जातं.

रानावनात फुलांवर उडणाऱ्या पिवळ्या रंगाच्या चिमुकल्या फुलपाखरांच्या पंखांना हळूवार स्पर्श करताच, तो हळवा पिवळा रंग आपल्या बोटांवर अलगद उतरावा... तशी ही भारतीय-आध्यात्मिक प्रतिकं, नुसत्या त्यांच्या स्मरणानंदेखील आपल्या अंतःकरणाच्या डोहात उतरत जातात. जे या परिसस्पर्शापासून वंचित रहातात, ते नदीतल्या गोट्यांसारखे समाजजीवनाचा प्रवाह अडवत-बडवत पडून रहातात...ते फक्त वरुन ओले होतात; पण, आतून न भिजल्याने वस्तुतः कोरडेच रहातात!

**जी पौर्वात्य-संस्कृती म्हणून आपण अभिमानाने मिरवतो आणि जिची कास धरल्याशिवाय, बेभान होऊन सर्वनाशाप्रत निघालेल्या, आजच्या आधुनिक ‘भांडवली-जगता’ला तरणोपाय नाही... त्या पौर्वात्य-संस्कृतीचा पायाच मुळी, या चिरस्मरणीय व्यक्तित्वांनी घालून दिलेला आहे.**

...पण, दुर्दैवाने हा ‘जैविक पाया’च उखडून टाकून, भाजपा-संघासारख्या कडव्या उजव्या राजकारण्यांनी; त्याजागी, राजकीय-संधिसाधू ‘निर्जीव काँक्रीट’ ओतलंय आणि त्यावर आपल्या हिणकस, समाजघातकी व धंदेवाईक राजकारणाची भलीमोठी इमारत उभी केलीय...हे करताना त्यांनी भारतीय-अध्यात्माची चिरफाड करत आपली ‘हिंदुत्वा’ची राजकीय-दुकानदारी तूफान चालावी; म्हणून अनेक ‘कथा आणि व्याख्या’ (Narratives) आपल्या सोयीनुसार हव्यातशा बदलल्या.

**सहिष्णुतेचं, प्रेम-वात्सल्याचं, सत्य व न्यायाचं प्रतिकरुप असलेल्या आमच्या प्रेमळ रामाला सीतेपासून तोडून, अगदी हिसकावून घेऊन...त्याचं उग्र, रागीट, शीघ्रकोपी धनुर्धारी ‘श्रीरामा’त रुपांतर केलं. धनुर्धर राम, हा युद्धजन्य परिस्थितीत प्रसंगपरत्वे अपरिहार्यपणे निर्माण होणारा ‘अपवाद’; तर, प्रेम-वात्सल्य व करुणेनं ओथंबलेला सीतेसह सत्यवचनी राम, हा भारतीय-अध्यात्माचा चिरस्थायी नांदणारा नियम आहे!**

स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणारे ‘रामराम किंवा जय सितारामा’चं ‘जय श्रीराम’ आणि आता, चक्क ‘रामनवमी’चं ‘श्रीरामनवमी’ वगैरे नामांतर करुन...महन्मंगल भारतीय-आध्यात्मिक परंपरेचा अवघा ताणाबाणाच विस्कटू पहातायत. ‘सत्यवचनी राम’ कुठे आणि यांत्रिकपणे ‘जय श्रीराम’ म्हणणारे व म्हणता म्हणता उठसूठ क्षणोक्षणी खोटं बोलणारे, हे भाजप-संघीय लोक कुठे... राम, हा भारतीय-नीतिमत्तेचा उत्तुंग आदर्श व आविष्कार; तर, संपूर्ण ‘भाजप’ हा भ्रष्टाचार, बलात्कार व अन्य लफडीकुलंगड्यांनी स्वतः बरबटलेला आणि तशाच अधम प्रवृत्तींना आधार देत, त्यांचा ‘राजकीय-आसरा’ घेणारा पक्ष... सांगा, केवढा हा विरोधाभास?

...तेव्हा प्रश्न, आपण या परिस्थितीवर काही विचारपूर्वक कृती करणार आहोत की, निर्बुद्ध मेंढरांसारखे भाजपाई-संघीय पातकी पावलांवर पाऊल ठेऊन ‘राष्ट्रनाश’ घडवणार आहोत; एवढाच आहे आणि तो आपणा सर्वांसमोर दत्त म्हणत उभा ठाकलेला आहे!

***...राजन राजे*** **(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

---

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही शिस्तबद्ध संघटना आहे हे त्यांचे विरोधकही मान्य करतात.

मग छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल संघाचेच लोक एका बाजूला घृणास्पद बोलतील आणि सरसंघचालक एकदमच त्यांचा पुळका येवून गौरवास्पद बोलतील.

औरंगजेबाची कबर खोदण्याचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्याच ‘‘सिस्टर’’ संघटना मुद्दा उपस्थित करतील आणि संघ साळसूद पणे त्या प्रश्नावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करून वाहवा ही मिळवतील.

एकाने असं बोलायचं आणि दुसऱ्याने तसं बोलायचं. एकाने ‘‘रथयात्रा’’ सुरु करायची तर दुसऱ्याने त्यात सहभागी न होता आपला विरोध अप्रत्यक्ष पणे दर्शवायचा.

एकाने गुजरात मध्ये दंगली घडवून आणायच्या आणि दुसऱ्याने त्याला ‘‘राजधर्म शिकवायचा.

मॉल मध्ये सर्वच प्रकारचा माल ठेवायचा असतो. कोणत्याही प्रकारचा गि-हाईक दुकानातून वापस जाता कामा नये.

आज मोदी,शहा,योगी, फडणवीस मालाचा उठाव असेल. उद्या त्या मालाची मागणी कमी होवू शकते. त्यामुळे ‘‘गडकरी’’ मालाचा ‘‘स्टॉक’’ आता पासूनच ‘‘मॉल’’ मध्ये तयार ठेवायला असतो.

मोदी पेक्षा तर गडकरी चांगला.

म्हणजे गि-हाईक दुसऱ्या दुकानात जाण्याचा विचारही करणार नाही. त्यामुळे हा असा बोलतो,तो तसा बोलतो याने भ्रमित होवू नका.

‘‘भ्रमित करावे सकळ जन’’ हा तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणित ‘‘मॉल’’चा खानदानी धंदा आहे. सध्या तर त्यांच्या ‘‘ मॉलमध्ये’’ गर्दी ही भरपूर आहे.

ती तशीच कायम ठेवण्यासाठी ह्या ‘‘क्लृप्त्या’’ आहेत.

एवढाच ‘‘हा असं बोलला तो तसं बोलला’’ ह्याचा अन्वयार्थ!

*– चंद्रकांत वानखडे*

# भाजपाईची राजकीय - नीतिमत्ताशून्यता...





ईव्हीएम हेराफेरी /निवडणूकपूर्व व निवडणूकपश्चात फसवणुकीचा खास भाजपाई गोरखधंदा /इलेक्टोरल-बॉण्ड, नोटबंदी वगैरे घोटाळ्यांतील काळा-पैसा आणि पराकोटीची राजकीय-नीतिमत्ताशून्यता... या व अशा लोकशाहीविरोधी बाबींच्या बळावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद बळकाविणारे देवेंद्रजी फडणवीस म्हणतायत, ''महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना टकमक टोकावरुन ढकललं पाहिजे!''

**...तेव्हा, त्याकामी सर्वप्रथम, ''शिवछत्रपतींचा अगदी ठरवून जाणिवपूर्वक घोर अवमान करणाऱ्या, 'काळीटोपी छाप' माजी राज्यपाल 'भगवा सिंग' कोश्यारी (क्रांतिकारक 'भगतसिंगां'चं नाव घेऊन अवमान का करावा हो?)... ज्यांची, सर्वोच्च न्यायालयाने घटनाविरोधी बेकायदेशीर कारभार करणारे राज्यपाल, अशी संभावना केली होती, त्यांचा नंबर लावावा'', अशी तमाम जागृत महाराष्ट्रीय शिवप्रेमींची जनभावना असणारच किंवा असलीच पाहिजे (अन्यथा, तशी भावना नसणारा, फक्त शिव जयंती-पुण्यतिथी साजरी करणारा 'नौटंकीबाज' ठरेल),...त्या जनभावनेचा त्यांनी आदर राखावा!**

विशेष बाब म्हणजे, त्याच किल्ले रायगड स्मारक मंडळाच्या ३४५ व्या शिव पुण्यतिथी सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असणाऱ्या केंद्रिय गृहमंत्री अमित(भाई) शाह यांनी ''ये क्या आंबेडकर, आंबेडकर लगा रखा है, ये तो आजकल आंबेडकर का बार बार नाम लेने की एक 'फॅशन' ही हो गई है'' असा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उघड उघड अपमान केला होता... हे दांडगी स्मरणशक्ति असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना चांगलंच स्मरत असेल. अशा 'अपराधी' केंद्रिय गृहमंत्र्यांबाबत नेमकी कुठली भूमिका आपले मुख्यमंत्री घेणार आहेत, ते ही समस्त मराठी जनतेला एकदाचं कळू दे...त्यांना मुख्यमंत्री 'टकमक' टोक दाखवणार की, बदलापुरच्या अक्षय शिंदे प्रकरणासारखी बनावट पोलिस 'चकमक' घडवणार?

तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे, **ज्या खा. उदयनराजे भोसले यांनी सदरहू कार्यक्रमाचं 'पुढारपण' केलं, त्या उदयनराजे-महाराजे यांना आता, कंत्राटी-कामगार पध्दतीतील गुलामगिरी व नवअस्पृश्यतेत खितपत पडलेल्या पश्चिम महाराष्ट्राच्या तरुणाईने, अत्यंत कडक शब्दात जाब विचारला पाहिजे की, ''तेरावे वंशज म्हणून ते शिवछत्रपतींच्या विचारधारेचा व राजनितीचा 'वारसा' चालवतायत की, त्या वारसा-विचाराचं 'तेरावं' घालतायत?''**

...कारण, ''शिवछत्रपतींनी 'वतने' खालसा केली''... म्हणजे, ''आजच्या परिस्थितीत बोलायचं तर, मूठभर प्रस्थापित धनदांडग्यांचं समाजावरील अन्यायी वर्चस्व नष्ट केलं व 'आर्थिक-विषमता' खूप कमी केली'' आणि ''शिवछत्रपतींनी 'कुळांना' स्थिरता दिली''... म्हणजे, ''आजच्या परिभाषेत, कंत्राटी-कामगारांना नोकरीत 'कायम' केलं''... तेव्हा, 'शिववंशज' या नात्याने व खासदार या जबाबदारीने उदयनराजे, हे पश्चिम महाराष्ट्रातली (महाराष्ट्रातली बात सोडाच) किंवा किमानपक्षी त्यांच्या मतदारसंघातली तरी, ''शिवछत्रपतींच्या नितीनुसार 'कंत्राटी-गुलामगिरी' प्रयत्नपूर्वक नष्ट करु पहातायत की, 'मसलमॅन' म्हणून ('मुसलमान' नव्हे हो...कारण, भाजपवासी झाल्यापासून त्या शब्दाची त्यांना फारच 'ॲलर्जी' झालीय ना) आपल्या प्रभावक्षेत्रात, 'शिवनिती'ला बेधडक धाब्यावर बसवून मराठी-रयतेचं रक्त-घाम भांडवलदारवर्गाला अत्यंत स्वस्तात विकण्याची 'कंत्राट-ठेके' स्वतःच घेऊ पहातायत किंवा त्यांचे बगलबच्चे घेतायत'', याचा त्यांनी जाहीर खुलासा करण्याची हिंमत दाखवावीच!

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**(संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'...शिवछत्रपतीराष्ट्र!)**

**...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

*(''मराठी-तरुणाईला 'कंत्राटी' फडतूस नोकऱ्यांची भीक नको... नोकऱ्यांमध्ये 'सन्मान-सुरक्षितता', उत्तम 'वेतन' व नफ्यातील हक्काचा वाटा म्हणून भरभक्कम 'बोनस' हवा''...या धर्मराज्य पक्षप्रणित 'श्रमिकांचा महाराष्ट्र अभियानां'तर्गत प्रसारित संदेश)*

---

२०२३ चा सर्वोच्च न्यायालयाचा पारदर्शी-निकाल पाशवी बहुमतावर बदलून, CEC हा केंद्र सरकारचा 'बटीक' बनवण्याच्या व त्याद्वारे, फसवणुकीच्या मार्गाने निवडणुका जिंकण्याच्या 'भाजप-संघीय' कारस्थानाचा तीव्र निषेध...!!!

निवडणूक-आयोगच सरकारच्या पंखाखाली आल्यास 'लोकशाही'ची घोर विटंबना होते, निवडणूक निव्वळ एक फार्स बनते व देशात हुकूमशाहीचा नंगानाच सुरु होतो...तो तर, भारतात केव्हाचाच सुरु झालाय!

"GO BACK DNYANESH KUMAR...GO BACK!"



## महाकाय

*जीवापाड जपलेली पुस्तके*
*छातीशी घट्ट कवटाळून मी वाचवली*
*बुलडोझर घरावर चालला*
*माझी शाळा जमिनीत गाडली*
*शाळेकडे जाणारा रस्ता त्यांनी उखणला*
*वाटेवरची सगळी झाडेही तोडली त्यांनी*
*उन्हात उभी राहून मी*
*पुस्तकातली प्रतिज्ञा वाचली,*
*आणि*
*पुस्तकाचा महाकाय बुलडोझर केला!*

**...मोहन देस**



# कामगारधर्माचं ‘भान राखणारा’ निरंजन व्यक्त होतो तेंव्हा

**ज्या ज्या वाचकांनी मनापासून चार कौतुकाचे शब्द निरंजनबद्दल लिहीले किंवा त्याच्या कवितेला सकारात्मक प्रतिसाद दिला...त्या त्या सर्वांचे अंतः करणपूर्वक आभार.**

**अनेकांनी निरंजनविषयी विचारणा केली; म्हणून अधिकचे चार शब्द, त्याच्याविषयी लिहीतोय. तसेच वाचकांच्या सोयीसाठी कवितेच्या तळाशी निरंजनचा फोन नंबरही यासाठी दिलेला आहे की, प्रत्यक्ष त्यालाच जर थेट प्रतिसाद मिळाला; तर, निरंजनची उमेद खचितच वाढेल....**

मितभाषी असलेला ‘निरंजन’ हा ‘गुणवंत कामगार’, सुल्झर पंप्स इं. प्रा. लि. (दिघा, नवी मुंबई) या कंपनीत वर्ष-१९९९ पासून अत्यंत कुशल व कसबी ‘मिलिंग ऑपरेटर’ (Milling Machine Operator) म्हणून कार्यरत असून तो तेथील ‘सेऊ’ (SEU...SULZER PUMPS INDI EMPLOYEES' UNION) या कामगार-संघटनेचा विद्यमान ‘खजिनदार’ (Treasurer) आहे.

निरंजन म्हात्रे, हा खरंतरं सातत्याने कामगार-चळवळीसंदर्भात कधि काव्यरुपाने तर कधि स्फूट म्हणून, काही भाष्य करत असतो...कुठलाही जाणकार कामगार, ज्याक्षणी आजुबाजच्या परिस्थितीचं नीट भान राखून त्याचं विचारपूर्वक आकलन करु लागतो; तेव्हा, तो स्वाभाविकच ‘अव्यक्त’ राहूच शकत नाही; तो अत्यंत जबाबदारपणे (बेजबाबदारपणे नव्हे) ‘व्यक्त’ होऊ लागतो. विद्याविभूषितांना



कामगारांची भाषा कदाचित थोडी रांगडी, काहीशी विस्कळीत वाटू शकेल; पण, त्यात एक अंगभूत गावरान ताकद असते... त्या ‘व्यक्त’ होण्यात एक ‘अंगार’ दडलेला असतो आणि अंगाराने प्रत्येकवेळी भाजूनच काढायचं,

**असं काही नसतं; तर, ‘अंगार आणि अंधार’ यांचा नैसर्गिक वैरभाव विचारात घेता, साचलेल्या अंधारात मिणमिणता का होईना, पण थोडा प्रकाशही ‘अंगार’ देऊन जातो...ज्या प्रकाशाच्या छोट्याश्या तिरिपीची, कामगारधर्माचं भान हरपलेल्या आणि नोकरी गमावण्याच्या भितीपोटी जीभ व अवसान गळून पडलेल्या, आजच्या कामगार-कर्मचारीवर्गाला नितांत गरज आहे!**

ज्यादिवशी, ज्योतीनं ज्योत पेटावी तसा...झोपी गेलेला किंवा कसल्याशा अवसानघातकी ग्लानीत (उदा. व्यसनाधीनता, मनाची हीनता-क्षुद्रता, अधम स्वार्थबुद्धी व त्यातून उद्भवणारी फुटीरवृत्ती इ.) अडकलेला ‘कामगार’ खऱ्याअर्थाने ‘जागा’ होईल...त्याक्षणीच, भारतातल्या अन्यायी-शोषक भांडवली-व्यवस्थेला नाक मुठीत धरुन समस्त कामगार-कर्मचारीवर्गापुढे शरण यावं लागेल...त्या शरणागतीतून अगदी ‘साम्यवाद’ (Communism) तत्काळ अवतरला नाही; तरी, ‘समाजवादा’चं अपरिहार्य रुपडं लेवूनच भारतातल्या रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्थेला (Vampire-State System) मग, आपल्या देशात वावरावं लागेल व त्यातूनच कामगार-कर्मचारीवर्गाला कायमस्वरुपी जगण्यात सन्मान व सुरक्षा मिळेल...जशी, ती द. कोरिया, जपान, स्कँडेनेव्हियन व इतर युरोपीय प्रगत देशांमध्ये मौजूद आहे; कारण, तिथला ’कामगार’ सदैव ‘जागा’ असतो...धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

**पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावरतरलेली नसून, ती कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे असं खणखणीत स्वरात बजावणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे...सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे...कामगार आहे मी, तळपती तलवार आहे...सारस्वतांनो, थोडासा गुन्हा घडणार आहे असा एल्गार करणाऱ्या नारायण सुर्वे यांच्याकडून प्रेरणा घेणाऱ्या, कामगारधर्म जाणणाऱ्या आणि कामगारांच्या रक्ताघामाचं मर्म जाणणाऱ्या... निरंजन म्हात्रे’, या एका लढवय्या कामगाराने स्वतःच्या शब्दात, कामगारांच्या सद्यस्थितीवर लिहीलेली एक ज्वलंत कविता पेश करीत आहोत, धन्यवाद!**

**...राजन राजे**

**कवी : निरंजन म्हात्रे (चला, शुभेच्छा देऊया...)**

चला, आज १ मे कामगार-दिनाच्या शुभेच्छा देऊया, भांडवलदार व्यवस्थापनांनंतर... कामगारच कामगाराचा शत्रू असला; तरीही, एकमेकांना शुभेच्छा देऊया, अन्याय होत असताना पेटून उठण्याऐवजी रिल्स् मध्ये रमलेल्या सुस्त जीवांना कामगार-दिनाच्या शुभेच्छा देऊया....
कदाचित भविष्यात, १ मे ला कामगार-दिन साजरा करायला कामगारच नसेल; असेल तो फक्त एक ‘गुलाम’.....
कारण,




*बदलून कामगार कायदे, केंद्राने काळ्या आचारसंहितेचा निर्णय घेतलायं.*
*राज्य सरकारनेही आता जन सुरक्षा अधिनियम उचलून धरलायं...*
*काळ्या कामगार-संहितेच्या रिंगणात उद्या कामगार टाहो फोडतील...*
*आणि रिंगणाभोवती कुबुद्धीच्या भांडवलदारांची भूतं नाचतील...*
*कंत्राटी-कामगार आणि फिक्स्ड टर्म कॉन्ट्रॅक्टला असेल अनिर्बंध परवानगी,*
*ले-ऑफ, कामगार कपात आणि कारखाना बंदीस भांडवलदारांना सगळी दारं मोकळी....*
*संप, मोर्चा, आंदोलन... हे तर तुम्हाला लोकशाहीने दिलेले अधिकार,*
*त्यासाठी जबर शिक्षा देण्यास सरकार घेणार, याच काळ्या कामगार-संहिता व जनसुरक्षा कायद्याचा आधार...*
*आता अस्तित्वंच धोक्यात येईल कामगार-संघटना आणि कामगारांचं,*
*मग उरेल का हो निदान, १ मे ला तरी महत्त्व कामगार-दिनाचं?*
*काळजातली हाळी, आभाळी गुंजणार कधी?*
*स्वतःच्या भविष्यासाठी कामगार लढणार कधी??*

**...निरंजन म्हात्रे** (९८२०८४७९२६)

# ‘कंत्राटी -कामगारपद्धतीतील नव-अस्पृश्यतेचं उच्चाटन, हाच बाबासाहेबांचा महागौरव! - राजन राजे





**गुणगौरवासाठी केवळ १४ एप्रिल व ६ डिसेंबरच्या जयंती-महापरिनिर्वाणाच्या सोहळ्यांच्या चौकटीत बाबासाहेबांना बंदिस्त न ठेवता, ‘कंत्राटी-कामगार पध्दती’तील गुलामांच्या व्यापाराला पायबंद घालून त्यातील नव-अस्पृश्यतेचं उच्चाटन करणे...हाच महामानवाचा खरा महागौरव होय!**

**‘‘गौतम बुद्ध, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर...ही महान व्यक्तित्वं, तशी शांत-संयत प्रतित होत असली किंवा शांततेचं प्रतिक भासत असली; तरी, ‘वर्णवर्चस्ववादी-अन्यायी-शोषक व्यवस्थे’विरोधात मूलतः एल्गार पुकारणारी होती आणि म्हणूनच ती व्यक्तित्वं, तत्कालीन सामाजिक-राजकीय व्यवस्थेला RDXसारखीच केवळ नव्हे; तर, अण्वस्त्रांपेक्षाही विस्फोटक भासत होती.**

‘आर्थिक समानतेविना, सामाजिक समरसता नाही आणि सामाजिक-समरसतेविना आर्थिक-समरसता नाही’; या अशा एकमेकात गुंफलेल्या दुपेडी समस्या असल्याने, त्यांच्यावर एकाचवेळेस एकत्रितपणे हल्लाबोल करावा लागेल...जेव्हा, ‘भाकरी आधी की, आत्मसन्मान’, या बुद्धिभेदी प्रश्नाला ‘दोन्ही एकाचवेळी’ असं निःसंदिग्ध उत्तर बाबासाहेबांनी दिलं; तेव्हा त्यांना हाच अर्थ अभिप्रेत होता.

‘कार्यकर्त्याचं पोट रिकामं असेल तर, तो पुढे लाचार बनतो व सहजी विकला जाऊ शकतो’ असं बाबासाहेब म्हणायचे; पण, आताशी कार्यकर्त्यांची पोटं ‘बकासुरा’च्या पोटापेक्षा मोठी झालीत...गाडाभर अन्न खाऊन बकासुराचं पोट, तेव्हा भरत तरी होतं; पण, आता इंपोर्टेड गाड्या भरभरुन खाऊनदेखील कार्यकर्ते, नेते आणि सरकारी अधिकाऱ्यांची ‘बकासुरी पोटं’ भरत नाहीत, हा असला कसला ‘भस्म्यारोग’ लागलाय, या सगळ्यांना?

**ज्यांची पोटं पाठीला चिकटली आहेत व जे पिढ्यानपिढ्या ‘बहिष्कृत’ आहेत, अशा जनसामान्यांबद्दल बाबासाहेब कायम बोलत राहिले, कृतिशील राहीले...बाबासाहेब, अजून दहापंधरा वर्षे जगले असते; तर, ‘कंत्राटी-कामगार पद्धत’ किंवा ‘आऊटसोर्सिंग’ (Outsourcing) सारखे कामगार-कर्मचारीवर्गाचे दशावतार करणाऱ्या आजच्या भांडवली-षडयंत्रांना, या देशात कधि थाराच मिळणार नाही; अशी...’दलाल-स्ट्रीट’वरील कॉर्पोरेटीय ‘भांडवली-बैलां’च्या नाकात वेसण घालणारी क्रांतिकारी-व्यवस्था लावून गेले असते;** म्हणूनच, गुणगौरवासाठी केवळ १४ एप्रिल व ६ डिसेंबरच्या जयंती-महापरिनिर्वाणाच्या सोहळ्यांच्या चौकटीत बाबासाहेबांना बंदिस्त न ठेवता, ‘कंत्राटी-कामगार पध्दती’तील गुलामांच्या व्यापाराला पायबंद घालून त्यातील नव-अस्पृश्यतेचं उच्चाटन करणे...हाच महामानवाचा खरा महागौरव होय! कंपनी-दहशतवादातील (Corporate-Terrorism) अमानुष शोषणातून उभारलेली आजच्या भांडवली-व्यवस्थेची इमारत वरकरणी कितीही मजबूत भासत असली; तरी, ती पत्त्याच्या बंगल्यासारखी तकलादू आहे... त्या इमारतीच्या पायामधला ‘कंत्राटी-कामगार पध्दती’चा एक ‘पत्ता’ फक्त काढून घ्याच...अवघी भांडवली-इमारत तुमच्या नजरेसमोर ढासळू लागेल आणि त्या ढासळण्यातूनच श्रमिकवर्गाला दिलासा देणारा व जनसामान्यांच्या अंगणी खेळणारा ‘संजीवक झरा’ मुक्त होईल, पुन्हा खळाळता होईल.


**...इथे हे मुद्दाम लक्षात घेतलं पाहिजे की, स्वातंत्र्यपूर्व काळातच १५ ऑगस्ट-१९३६ रोजी स्वतंत्र ‘मजूर पक्षा’ची स्थापना करत बाबासाहेबांनी ‘ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही’ हे भारतीय कामगारांचे दोन मोठे शत्रू आहेत; अशी भीमगर्जना केली होती...आजही कुठे वेगळी परिस्थिती आहे? परिस्थिती आजही बिलकूल बदललेली नाही...तेव्हाही, वर्णवर्चस्ववादी-शोषक व्यवस्थेला आव्हान देणाऱ्यांना अग्निपरीक्षेला सामोरं जावं लागत होतं आणि आजही रक्तपिपासू-अन्यायी-शोषक ‘भांडवली-व्यवस्थे’ला अंगावर घेणाऱ्या आमच्यासारख्यांना तहहयात यातनामय प्रवास घडवला जातोय.’’**

*(...डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त, ‘संजीवनी बहुउद्देशीय सेवा प्रतिष्ठान’ ठाणे (राबोडी) आयोजित सोहळ्यात ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचा घणाघात!)*



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त, दि. १४ एप्रिल-२०२५ रोजी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या चंदनवाडी शाखा (ठाणे, प.) येथे, शिवसेना उपनेते श्री. राजनजी विचारे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली, ‘रक्तदान-शिबीर’ आयोजित करण्यात आले होते. ‘शिव आरोग्य सेना’ आणि ‘हेल्प मेडिकल फाउंडेशन’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदार दिघे, शिवसेना ठाणे शहरप्रमुख श्री. प्रदीप शिंदे, ‘धर्मराज्य पक्षा’चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण आदी मान्यवरांसह, मोठ्याप्रमाणात महिला कार्यकर्त्या आणि शिवसैनिक उपस्थित होते. याप्रसंगी, शिवसेना चंदनवाडी शाखेच्या वतीने, मा. राजन राजे यांचा शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# बाबासाहेब समजून घेताना...




**एका बाबासाहेबाने एकहाती हजारो वर्षांची गुलामगिरी व अस्पृश्यता नष्ट केली...तर, आजच्या राजकारणी दुकानदारसाहेबांनी मिळून, कंत्राटी-कामगार पध्दतीतली नव-गुलामगिरी व नव-अस्पृश्यता श्रमिकवर्गावर लादली!**

**१४ एप्रिल व ६ डिसेंबर दोन दिवशी महामानवाच्या जयंती-पुण्यतिथीची भरते औटघटकेची जत्रा...वर्षातल्या ३६३ दिवशी, अमानुष आर्थिक-विषमतेतून निघत रहाते, 'महामानवा'च्या 'समतेच्या संदेशा'ची नित्यनेमाने अंत्ययात्रा!**

**''बाबासाहेबांच्या तसबिरींच्या नशिबी सरकारी कचेऱ्यांच्या 'भिंती'!**

**बाबासाहेबांच्या पोरांच्या नशिबी रोज 'नोकरी' जाण्याची 'भिती'!!''**

**...तेव्हा, कंत्राटी-कामगार पध्दतीतील गुलामांच्या व्यापाराला पायबंद व त्यातील नव-अस्पृश्यतेचं उच्चाटन...हाच महामानवाचा महागौरव होय!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एखाद्या जातीचे 'आयकॉन' बनवणे, हा डॉ. बाबासाहेबांनी ज्यांचा प्रस्थापितपणा उध्वस्त केला, त्यांचा 'राजकीय-अजेंडा' आहे; त्या राजकीय अजेंड्याला कॉऊंटर करायचं, तर डॉ. बाबासाहेबांचे 'वैश्विक' (भारतातच नाही, तर भारताबाहेर देखील ) आणि सार्वकालिक (पुढच्या अनेक पिढ्यांसाठी कसे उपयुक्त आहे) 'अपील' काय आहे, यावर सतत मांडणी केली गेली पाहिजे

काय आहे डॉ. बाबासाहेबांचे वैश्विक आणि सार्वकालिक अपील ? (आणि ही यादी, अर्थातच परिपूर्ण नाही)

- कोणताही शैक्षणिक वारसा मिळालला नसताना त्या त्या काळातीलच नव्हे; तर सार्वकालिक अत्युच्च शैक्षणिक पात्रता कमवता येते, हे दाखवून दिले
- सामाजिक / राजकीय शत्रूच्या वैचारिक अंगणात जाऊन शत्रूच्या भाषेत म्हणजे, इंग्रजी भाषेत त्यांच्या वैचारिक / सांस्कृतिक वारशांची चिरफाड केली
- समाज-परिवर्तनासाठी नुसते ग्रंथ वाचन आणि ग्रंथ लेखन पुरते मर्यादित न ठेवता; त्याला जन आंदोलनाची जोड दिली पाहिजे / त्यासाठी, लोकांना संघटित देखील केले पाहिजे, हे कृतीने दाखवून दिले
- ''भाकरी आधी की, आत्मसम्मान'', या बुद्धिभेदी प्रश्नाला ''दोन्ही एकाचवेळी'' असं निस्संदिग्ध उत्तर दिले
- आपण ज्यांच्या उद्धारासाठी काम करतो, त्यांच्या गरिबी / दारिद्र्याचे ओझे न बाळगता सुटाबुटात टेचात राहिले
- सगळे काही करताना, आपल्या किमान राहणीमानासाठी आवश्यक ते पैसे कमावले
- ठरवलेच असते; तर, तत्कालीन एलिट-क्लासमध्ये एंट्री पास मिळू शकत असताना, त्या क्लबमध्ये सामील होण्यास नकार दिला
- तुम्ही किती पुस्तके वाचून स्वतःच किती संपृक्त झालात हे महत्त्वाचे नसते, आपल्या आणि पुढच्या पिढयांना शहाणे करण्यासाठी काय केलेत...हे महत्त्वाचे असते, हे कृतिने सांगितले
- आयुष्यभर राजकीय शत्रुत्व केल्यानंतर, स्वातंत्र्यानंतर बदललेल्या राजकीय संदर्भात अतिशय प्रगल्भपणे देशाच्या सामुदायिक नेतृत्वात सामील झाले
- आणि उराशी बाळगलेल्या स्वप्नांसाठी, ध्येयासाठी अक्षरशः दिवसाचे २४ तास शरीर, मन, बुद्धी झिजवायची असते, हे शिकवले
- डॉ बाबासाहेबांचे हे 'अपील' सर्व जाती / धर्मापलीकडचे आहे, ते भारतापुरते मर्यादित नाहीये आणि भविष्यात येणाऱ्या अनेकानेक पिढयांना ऊर्जा देत राहणारे आहे

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना लक्ष लक्ष प्रणाम !

***...संजीव चांदोरकर***

## तुला व्हावेच लागेल आंबेडकरवादी!

तुझा जन्म भारतात झाला असेल तर
तुला व्हावेच लागेल आंबेडकरवादी,
मग तू कोणत्याही जातीचा अस.
आंबेडकरवादी होणे म्हणजे जातीअंताच्या लढाईचा सक्रिय सैनिक होणे आहे तुला.
'जात मानत नाही' एवढे म्हणणे पुरेसे नाही तुला.
जात मोडण्याची कृती करणे आहे तुला.
जातीबाहेरचे मित्र जोड,
त्यांच्या हातचे जेवण जेव,
जातीबाहेर लग्न कर.
अगदी आईबापाचा मूर्ख विरोध पत्करून कर!
जात मानणारे उत्सव सोड,
जात मानणारे सण सोड,
जात मानणारे देव सोड.
जातीच्या संघटनेवर बहिष्कार घाल, जातीच्या व्यासपीठावर बहिष्कार घाल.
जातीच्या खेळींना भुलू नकोस.
ते तुझा सत्कार ठेवतील,
तुला पुरस्कार जाहीर करतील.
तेव्हा भिडेखातर गप्प राहू नकोस,
निःसंशय नकार दे.
जिथे दुसऱ्या जातीतील माणसाला प्रवेश नाही,
तिथे तूदेखील बहिष्कार घाल.
वाटते तितके सोपे नाही हे.
तुझ्या मेंदूवर जात गोंदलेली असते तुझ्या नकळत!
होय, जात शिकवली जाते जन्मापासून अगदी पाव्हलाव, स्किनर मंडळींची तत्त्वे वापरुन!
म्हणून मनाचे डि-लर्निंग कर.
खानदानाचा अभिमान सोड, कुळ गोत्राचा अभिमान सोड.
नवे शिकण्यापेक्षा जुने सोडणे कठीण असते.
म्हणून मनाला गदगदून काढ.
प्रश्न विचार,
उत्तरांच्या पळवाटा उद्वस्त कर.
विचार मनाला, का नाही एकही भंगी तुझ्या नात्याचा,
का नाही एकही कचरा उचलणारा तुझ्या नात्याचा?
सवयच लाव सतत मनाला शुद्ध करण्याची,
तेव्हाच होईल 'सर्वेत्र सुखिनः संतु'.

**- डॉ. रुपेश पाटकर**



# नेमेची येतो १ मे रोजी, तो कामगार व महाराष्ट्र दिन....

...पृष्ठ क्र. १ वरुन

३ काळ्या शेतकरी-कायद्यांचा वरवंटा शेतकऱ्यांवर फिरवण्याचा प्रयोग, शेतकऱ्यांच्या आंदोलनाने व शेकडो शेतकऱ्यांच्या आहुती-बलिदानाने साफ फसल्यानंतर... ४ काळ्या कामगार-कायद्यांची 'काळी कामगार-संहिता' (Black Labour-Code) शिवबा-संतांच्या महाराष्ट्रात, 'देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदे-अजित पवार' या 'भाजप-संघीय' ट्रिपल-इंजिन सरकारकडून लागू करण्यात येतेय; याचाच सरळ अर्थ, अर्धमेल्या झालेल्या कामगार-चळवळीला 'शवपेटी'त कोंडून, शवपेटीवरचा शेवटचा खिळा ठोकण्याचं काम सुरु झालंय.... तरीही तुम्ही दारु, सण-उत्सवाच्या नशेत आणि क्षुद्र स्वार्थ-अहंकारापोटी 'भांडवली-व्यवस्थे'विरुद्ध लढण्याऐवजी, आपापसातच लढण्यात व काम गार-एकजूट फोडण्यातच दंग...???

मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा...पाठीवरती हात देऊन, तुम्ही फक्त लढ तर म्हणा...असं लढवय्या मराठी-तरुणाईचं बुलंद वर्णन करणाऱ्या, 'महाकवी' कुसुमाग्रजांच्या महाराष्ट्रातच आज...'श्रमाविना संपत्ती कमावणाऱ्या' महापातकी राजकारणी-कंत्राटदारांनी आणलेल्या, कंत्राटी-कामगार पध्दतीच्या 'गुलामगिरी-नवअस्पृश्यते'मुळे मराठी-तरुणाईचा 'पाठकणा'च मोडून पडलाय!

...एका 'बाबासाहेबा'ने शेकडो वर्षांची 'गुलामगिरी व अस्पृश्यता' नष्ट केली; तर, आजच्या राजकारणी 'दुकानदार'साहेबांनी कंत्राटी-कामगार पद्धतीद्वारे अन्याय-अत्याचार व शोषणाचा 'भांडवली-कहर' माजवणारी, 'नवगुलामगिरी व नवअस्पृश्यता' आणली!

परप्रांतीयांकडे आज येथे, 'मालमत्ता-मानसन्मान' आहे...महाराष्ट्रदेशी, मराठा 'कंत्राटी-गुलामी'त 'बंदिवान' आहे!

...'पाठकणा' मोडून पडलेल्या या मायमराठ्यांना ताठ मानेनं उभं करण्यासाठी...'धर्मराज्य पक्ष' व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे 'कंत्राटी-कामगार पध्दती'विरुद्ध धर्मयुद्ध सुरुच!

...'कंत्राटी-कामगार' प्रथेवर घाला...न्याय, मराठी-काम गाराला...!!!

...धर्मराज्य पक्षाला 'मतदान', म्हणजे 'कंत्राटी-कामगार' प्रथेला 'पिंडदान'!

कुणी मराठी माणसाची नोकरी, व्यवसाय बुडवला... कोणामुळे मराठी माणसाचा 'सातबारा' जातोयं खोडला....

कोणा कारणे, काळ्या आईचा भरबाजारी मांडला जातोयं 'भोंडला'...शिवबांच्या महाराष्ट्राचा कुणी 'ताठ कणा' मोडला....???

नोकऱ्या गेल्या...पिढ्यापिढ्यांचे धंदे-व्यवसाय बुडाले....

महाराष्ट्राच्या सातबाऱ्यावरची मराठी नावं पुसली जातायतं....

...जणू, महाराष्ट्राची जमीनच मायमराठ्यांच्या पायाखालून सरकतेयं; तरी, मराठी-माणूस काय अजून 'आभाळ' कोसळण्याची वाट बघतोयं...??? पारतंत्र्याच्या काळात म्हटलं जायचं, तराजू-तागडी धरोनि हाती, जिंकीला भारत 'साहेबा'ने !

...तर, आता म्हणावं लागेल, एका हाती धरोनि तराजू-तागडी आणि दुसऱ्या हाती धरोनि राजकीय-मराठी हात, जिंकीला महाराष्ट्र...जैन-गुजराथी-मारवाड्यांनी...!!!

...स्वातंत्र्यापश्चात कायदा-सुव्यवस्था पाळणाऱ्या शिवबा-संतांच्या पावनभूमी महाराष्ट्रात 'संपत्ती-निर्मिती' प्रक्रियेनं वेग धारण केल्यानंतर, वरुन अवघा महाराष्ट्र लुटणारे जैन-गुजराथी-मारवाडी भांडवली धनदांडगे आणि खालून उत्तर भारतीयांचे अनियंत्रित लोंढे...यांच्यामध्ये, 'सॅण्डविच' होऊन मायमराठ्यांचा उत्तरोत्तर असह्य कोंडमारा होऊ लागला....

...त्यामुळे, सत्तेमत्तेच्या आहारी गेलेल्या भ्रष्ट, दलाल मराठी-राजकारण्यांच्या अगदी पथ्यावर पडणारी; एक भयंकर परिस्थिती महाराष्ट्रात तयार झाली...त्यातूनच, महाराष्ट्रात निर्माण होणारी संपत्ती, हळूहळू महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य मायमराठी माणसांच्या मुळावर येऊ लागली आणि आजच्या घडीला आपल्या हक्काच्या महाराष्ट्रातच सामान्य मराठी-माणूस 'दुय्यम-नागरिकत्वा'चा शाप भोगू लागलाय....

...तेव्हा, झोपी गेल्या मराठी माणसा ऊठ, 'धर्मराज्य' के अलावा बाकी सब झूठ!

**हीनदीन झालेल्या मायमराठ्यांना, शिवछत्रपतींच्या राजनितीचं आश्वासन देणारा, कामगारदिनाचा आणि महाराष्ट्रदिनाचा खास 'धर्मराज्य-सलाम'!**

**'जय हिंद, जय महाराष्ट्र' नव्हे; यापुढे गर्जत म्हणा....**

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'...राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'...शिवछत्रपतीराष्ट्र!**

****....राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

# दीनानाथ हे या मोठ्या आजाराचे छोटे लक्षण आहे

दीनानाथ मंगेशकर प्रकरण हे हिमनगाचे टोक आहे. खरा खोल प्रश्न हा आहे की, आपल्या सुविधा या सरकारी असाव्यात की खाजगी? आपला सगळा त्रागा संताप याचे नीट उत्तर मिळत नाही म्हणून होतो आहे.

सरकारी शाळा आहेत. सरकारी दवाखाने आहेत. सरकारी बस सर्व्हिस आहे. पोस्ट ऑफिस आहे. अंगणवाडी आहे. या सेवा वापरल्या तर, त्याला कोणतेच डिपॉझिट भरावे लागणार नाही. पण, दुर्देवाने या सेवांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिले..

त्यात काही सरकारी व्यवस्थेच्या बदनामीचा ही भाग होता

पण नोकरीतील स्थिरता, भ्रष्टाचार, अधिकारी वर्ग व प्रेरणा नसणे यामुळे या सेवांचा दर्जा एकुणात ढासळला हे खरे आहे. त्यामुळे हळूहळू मध्यमवर्ग या व्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न करण्यापेक्षा त्यापासून दूर गेला...

**तो पलायनवाद होता. सरकारी शाळा, महापालिका शाळा सुधारण्याचे प्रयत्न करण्यापेक्षा त्याने खाजगी शाळा, इंग्रजी शाळा स्वीकारल्या. महापालिका दवाखाने सरकारी दवाखाने सुधारण्यापेक्षा खाजगी कॉर्पोरेट दवाखाने स्वीकारले. बस वाहतूक सुधारण्यापेक्षा त्यांनी कॅब व खाजगी बस स्वीकारल्या. पोस्टामधून टपाल नीट जात नाही तर त्यांनी कुरिअरचा मार्ग निवडला...**




मध्यमवर्ग सरकारी सेवेचा लाभार्थी राहिला नाही, त्याचा परिणाम असा झाला की, या सेवा अधिक खालावत गेल्या. त्यांच्यावरचा अंकुश कमी झाला.

याला आणखी एक पैलू होता.

**त्यात पुन्हा सरकार या सेवांवर खर्च कमी करत असल्याने या सेवा आकर्षक राहिल्या नाहीत व त्याच वेळी या मध्यमवर्गाची आर्थिक स्थिती अफाट सुधारली त्यामुळे महाग खाजगी सेवांकडे जाणे हा एक प्रतिष्ठेचा सिम्बॉल बनला...**

खाजगी सेवा सुरुवातीला स्वस्त ठेवल्या. सुरुवातीला सेवा स्वस्त ठेवल्या आणि नंतर महाग करत नेल्या..तो पर्यंत सरकारी सेवा कोलमडल्या होत्या. आपला स्पर्धक राहिला नाही म्हटल्यावर, खाजगी सेवांनी लूट सुरू केली...मध्यमवर्ग आणि त्या मागे आलेला गरीब वर्ग पार अगतिक झाला ...

थोडक्यात सरकारी सेवेत कंटाळा, अनास्था आहे आणि खाजगी सेवेत लूट आहे, उद्दामपणा आहे. याच्या मधला रस्ता काय आहे हा खरा दीनानाथ निमित्ताने प्रश्न आहे...

१) एकतर सर्व सरकारी व्यवस्था सुधारण्याकडे सर्वांनी लक्ष देऊन त्यातील भ्रष्टाचार अनागोंदी दूर करण्याकडे लक्ष देणे,आंदोलन करणे,सतत पाठपुरावा करणे

२) खाजगी व्यवस्थापन असलेल्या सर्व शाळा दवाखाने बस व सर्व सुविधा वर नियंत्रण करण्यासाठी ग्राहक चळवळ मजबूत करणे, न्याय,तक्रार यंत्रणा वेगवान करणे

त्यासाठी शहरी भागात संघटन होणे

**३) सरकारी व खाजगी हे दोन्ही पर्याय ठेवून सरकारने सरकारी शाळा दवाखाने यांना अनुदान न देता, ती अनुदानाची रक्कम व्हाउचर स्वरूपात ग्राहकांना द्यावी..यातून ती रक्कम मिळावी म्हणून सरकारी व खाजगी व्यवस्था चांगली सेवा देण्याची स्पर्धा करतील.. अर्थात यात ही खूप काळजी घ्यावी लागेल..**

४) परदेशात सरकार सगळ्या सेवा देते..खूप खर्च करते. तिथला दर्जा चांगला का राहतो? वर्क कल्चर सरकारी क्षेत्रात का असतो...? याचा अभ्यास करण्याची गरज आहे.

या पलीकडे ही अनेक उपाय करता येतील...

त्यावर चर्चा व्हावी.

दीनानाथ हे या मोठ्या आजाराचे छोटे लक्षण आहे..

*हेरंब कुलकर्णी*

# रामायणातील क्लायमॅक्स!

**मी शाळेत जायला लागायच्या आधीच बाबांनी मला रामायणाची गोष्ट सांगितली होती. रोज रात्री झोपताना ते रामायणातील एकेक गोष्ट सांगित. आता टीव्हीवर जशा मालिका असतात, तशी ती बाबांची श्रुतिका होती. काही गोष्टी मी त्यांना पुन्हा पुन्हा सांगायला सांगे. ते सांगत असताना माझ्या डोळ्यांसमोर प्रसंग उभे रहात. मला त्यातील राक्षसांच्या, चमत्कारांच्या नि युद्धांच्या कथा विशेष आवडत. अर्थात माझे वय देखील त्यावेळेस चमत्कारिक गोष्टी आवडण्याचेच होते. पण बाबांना जी गोष्ट सांगायला आवडे ती भरत भेटीची. ती सांगताना बाबांच्या डोळ्यात पाणी येई. मला त्यावेळेस त्याचे कारण समजत नसे.**

मी दहा वर्षांचा असताना बाबांना एका कार्यक्रमासाठी नागपूरला जावे लागले. त्या भेटीत त्यांनी भक्तीभावाने रामटेक पाहीले आणि पवनारचा विनोबांचा आश्रमदेखील पाहीला. परत आल्यावर त्यांनी पवनार आश्रमात पाहिलेल्या एका मूर्तीविषयी मला भरभरून सांगितले. ही मूर्ती विनोबांना आश्रम परीसरात खणत असताना सापडली होती. विनोबांनी मूर्ती सापडण्याला दैवी संकेत मानला आणि ती मूर्ती आश्रमात स्थापित केली. ती मूर्ती होती राम-भरत भेटीची! रामायणातील जो प्रसंग सांगताना बाबा भावूक होत त्याच प्रसंगाची. बाबा म्हणाले, 'राम- भरत भेटीचा प्रसंग हा रामायणाचे सार आहे. भक्तीचा परमोच्च बिंदू आहे!'



खरं म्हणजे तुम्ही रामायणाची कथा ऐकली तर हा तसा फारच दुय्यम प्रसंग वाटतो. चतुश्लोकी रामायणात तर, भरताचा उल्लेखदेखील येत नाही. रामायण म्हटले की, आपल्या मनात सीताहरण आणि राम-रावण युद्ध याच गोष्टी ठळकपणाने येतात.

**माझ्या बाबांचं मत जरी बाजूला ठेवलं तरी, हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका शिल्पकाराच्या प्रतिभेला हा प्रसंग दगडात कोरुन ठेवावासा वाटला ही गोष्टच या प्रसंगाबाबत खूप काही सांगून जाते. थोडासा विचार केल्यास 'भरत भेटीचं मर्म' आपल्या लक्षात येईल.**

हे सगळे रामायण मुळात घडले ते भरताला अयोद्धेचा राजा करण्यावरून. श्रीरामाच्या वनवासाचा भरत हा सर्वात मोठा लाभार्थी होता. तो अयोद्धेचा राजा होण्यासाठी सर्वकाही घडून आले होते. कैकयीने वर मागितला, हट्ट केला, रामाने वडीलांच्या वतीने कैकयीला दिलेल्या वचनाची पूर्ती केली. रामाचा युवराज्यभिषेक रद्द झाला आणि श्रीराम, लक्ष्मण व सीतेसह वनवासात निघून गेला. हे सर्व भरत अयोद्धेत नसताना, तो आजोळी असताना घडून आले होते. त्यामुळे तो जेव्हा आजोळहून अयोद्धेत परत आला तेव्हा त्याला हे सरप्राईज होते. आता भरत राजा होणार ही काळ्या दगडावरची रेघ होती. पण या होऊ घातलेल्या राजाने काय केले? रामाच्या शोधात तो जंगलात गेला. लक्ष्मणालादेखील त्याच्या अशा आपल्यामागे येण्याचा संशय आला. चौदा वर्षांनी राम परत अयोद्धेत येऊ नये म्हणून हा रामला कायमचा संपवायला आला असावा असे लक्ष्मणाला वाटले.

पण या भरताने रामाकडे काय मागितले? आईने वडीलांच्या मृत्यूची किंमत चुकवून त्याच्यासाठी मिळवलेले राज्य रामाने परत घ्यावे, ही त्याची विनंती होती! भरत आपल्या आईवर, कैकयीवर कठोर टीका करत होता.

या प्रसंगी गीतरामायणातील गदिमांचा राम म्हणतो, 'दैवजात दुखे भरता, दोष ना कुणाचा. पराधिन आहे जगती पुत्र मानवाचा!' हे उद्गार वरवर प्रारब्धभावाचे वाटत असले, असहाय्यता व्यक्त करणारे वाटत असले तरी ते मानवाची असहाय्यता अधोरेखित करायला आलेले नाहीत. लक्षात घ्या, हे रामाच्या तोंडचे उद्गार आहेत. केव्हाचे? भरत आपल्या आईला दोष देतो तेव्हाचे. या सगळ्याचे कारण आपल्या आईचे कैकयीचे कर्म आहे, हे भरत खेदाने व्यक्त करतो त्यावेळचे. असे बोलण्यासाठी रामाचे मन किती विशाल असेल याचा विचार करा. तो म्हणतोय की 'आपल्याला वनवासाला पाठवण्यात कैकयीचा दोष नाही, मंथरेचा दोष नाही.' असाच प्रसंग आपल्यावर आला तर आमच्या तोंडातून निघतील का रामासारखे उद्गार? आम्ही आमच्यावर अन्याय करणाऱ्याचा दोष नाही असे म्हणू का? नाही म्हणणार! म्हणूनच राम अवतार मानले जातात आणि आपण बद्ध जीव.

आणि आम्ही भरतासारखे तरी वागू का? आपल्या वाट्याला परिस्थितीने म्हणा किंवा इतरांच्या प्रयत्नांनी म्हणा, आलेली संपत्ती आम्ही ज्याची त्याला परत करु का? नाही करणार. आम्ही तर आमच्या प्रत्येक लहान मोठ्या मदतीची देखील परतफेड अपेक्षित असतो. म्हणूनच भरत भक्त शिरोमणी आहे आणि आम्ही बाजार शिरोमणी आहोत.

**आणि या भेटीची सांगता कशी होते? दोघेही आपआपली भूमिका सोडत नाहीत. राम चौदा वर्षांचा वनवास भोगायला पुढे जातो. आणि भरत रामाच्या पादुका घेऊन त्या सिंहासनावर ठेवून राम परत येईपर्यंत त्याचा प्रतिनिधी म्हणून राज्य चालवण्यासाठी अयोद्धेत परत येतो. आणि हा रामाचा प्रतिनिधी असलेला, पण प्रत्यक्षात अयोद्धेचे राज्य चालवणारा राजा राहतो कसा? आपल्या वनवासाला गेलेल्या भावासारखाच. राजमहालात न राहता एका तपस्वीसारखा पर्णकुटी बांधून. पुढची चौदा वर्ष! भरतासारखा आदर्श भक्त आणखी कुठे पहायला मिळेल? आणि म्हणूनच रामायण ही केवळ ऐकण्याची आणि सांगण्याची गोष्ट नाही, ती चिंतनाची गोष्ट आहे, अनुकरणाची गोष्ट आहे. ती मनाला उन्नत करणारी गोष्ट आहे!**

**- डॉ.रुपेश पाटकर**

---

*साधारण २०० प्रकारच्या व संख्येने सरासरी ३० हजार अब्ज पेशींच्या समुहाने बनलेल्या आपल्या मानवी शरीरात, काही विशिष्ट पेशीसमूह कॅन्सरग्रस्त जसे बनतात...तद्वतच भांडवलशाहीतला, जवळपास प्रत्येक व्यावसायिक-पेशीसमूह अथवा स्वतंत्र व्यावसायिक-पेशी...नफ्याच्या अवधारणेने व लालसेने एकप्रकारे कॅन्सरग्रस्त; म्हणजे, विकृत बनलेली असते! मग, असा रोगग्रस्त भांडवली-समाज यथावकाश आतून सडत जातो, त्याच्या रंध्रारंध्रातून सडलेलं रक्त व पू वहायला लागतो, त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरायला लागते...जे आज आपण आजुबाजुला व जगभर सर्वत्र अनुभवत असतो. माणसं, जनावरांपेक्षा क्रूर, पिशाच्चांपेक्षाही हिडीस-विकृत वागताना दिसतात. जणू, नरदेहात त्यांच्या भांडवली-व्यवस्थेने पशू किंवा पिशाच्चांचा 'डीएनए' (DNA) वा आत्मा ठासून भरलेला असतो!*

---

*नियंत्रणमुक्त अशा मनमानी पद्धतीने व्यापारधंदा (Laissez-Faire) करता यावा म्हणून, ''तुम्हाला 'लोकशाही' हवी... 'निसर्ग-पर्यावरण' हवं की, 'आर्थिक-विकास' हवा''? असा खिंडीत गाठल्यासारखा प्रश्न, जेव्हा भांडवली-व्यवस्था विचारत असते...तेव्हा, आम्हाला मूलतः जीवनात 'सुखसमाधान-सुरक्षितता' हवी, हे आपल्याकडून उत्तर दिलं गेलं पाहिजे. भांडवली-व्यवस्थेने 'आर्थिक-विकास' नावाचा जो भूलभुलैया त्याकामी उभा केला, त्यामुळे जे आमचं 'साध्य' होतं...तेच मुळातून, 'आर्थिक-विकासा'चं 'साधन' वापरता वापरता नष्ट करुन टाकलं गेलं! तेव्हा, जर 'सुखसमाधान-सुरक्षितता' हेच आमचं साध्य असेल; तर, 'लोकशाही'; तसेच, 'निसर्ग-पर्यावरण', हीच त्यासाठी आमची 'संसाधने' होत; हा आपला आग्रह कायम राहिला की, 'भांडवली-व्यवस्थे'ला घरघर लागलीच समजा...*

# फडणवीस–वडेट्टीवार विवादानंतर....



**देवेंद्रजी,**

**अहो, अजून किती आणि कुठली खालची पातळी गाठणार आहात तुम्ही? तुम्ही खरोखरीच 'हिंदू' आहात की, 'हूण' ??**

**दहशतवाद्यांकडे धर्म तपासण्याएवढा वेळ होता का? असे उद्गार जर विजय वडेट्टीवार काढत असतील...तर देवेंद्रजी, ते एकप्रकारे तुमच्या केंद्रिय गृहमंत्रालयाच्या सुरक्षेविषयी काहीसे गौरवोद्गारच काढतायत, याचंही आकलन होण्याएवढी धर्मविद्वेषाने तुमच्याकडे मती शिल्लक राहिलेली नाही, असं खेदाने म्हणावसं वाटतं.** प्रत्यक्षात, देवेंद्रजी, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे दहशतवादी तशी तपासणी करत होते, असं खरं धरलं आणि समजा अगदी तसं असलं जरी; तर, त्याचा सरळ अर्थ असा होतो की, तुमचं अमित शहांचं गृहमंत्रालय अगदी सुस्त सुस्त व हजारो पर्यटकांच्या जिविताबद्दल पूर्णतया बेफिकीर असल्यामुळेच दहशतवाद्यांच्या हाती, धर्माच्या चांभार–चौकशा करायला भरपूर वेळ आरामात शिल्लक होता...तेव्हा, या संतापजनक दुर्दैवी घटनेच्या विस्तवावर आपली भाजपाई मतांची पोळी भाजून घ्यावी, इतक्या क्षुद्र व नीच विचाराने आपण सारेच भाजप-संघीय लोकं प्रेरित झालेले आहात.

जरा लक्षात घ्या की, ज्यांच्या घरात मृत्युचं तांडव झालं, ती गुजराथी पर्यटक मंडळी आणि महाराष्ट्राच्या डोंबिवलीतली मंडळी...आजच्या घडीला काय म्हणतायत ते जरा, आपले 'नागपुरी' कान लावून नीट ऐकाच (आपल्या सोयीसाठी खास एका अभागी गुजराथी महिलेच्या आक्रंदनाचा व्हिडीओच सोबत पाठवीत आहे)!

**उरीतल्या १९ लष्करी जवानांचे बळी, पुलवामातील ४७ CRPF जवानांचे बळी आणि आता, पहलगाममधील २७ पर्यटकांचे बळी...मतांची झोळी भरण्यासाठी, हा कुठला 'नरमेध यज्ञ' आपण साऱ्यांनी आरंभलायत, देवेंद्रजी, त्याच प्रथम उत्तर द्या आणि मगच जनतेचं लक्ष, आपल्या 'नाकामी व नीचते'वरुन इतरत्र वळवण्यासाठी, वडेट्टीवारांसारखी गिऱ्हाईकं शोधा...!!!**

काँग्रेसचे वडेट्टीवार देश एकसंध राखण्यासाठी आटापिटा करतायत आणि आपण...???

ज्या काश्मिरींनी स्वकष्टाने पाठीवरुन, घोड्यावरुन उपचारासाठी जखमींना अडचणीच्या मार्गावरुन लांब अंतरावर उचलून नेलं, ज्या सय्यद आदिल हुसेन शाह ने 'अतिथी देवो भव' या उत्तुंग भारतीय-आध्यात्मिक परंपरेला स्मरुन आपलं बलिदान दिलं...त्यांच्याविषयी, आपण आपले किती शब्द खर्ची घातलेत हो, देवेंद्रजी? वडेट्टीवारांवर दुगाण्या झाडायला आपल्याकडे भरपूर वेळ आहे; पण, सय्यदसाठी आपल्याकडे वेळ कुठून असणार, नाही का?

**...जाता जाता एक गोष्ट लक्षात ठेवा देवेंद्रजी, पर्यटकांच्या हत्येमुळे सगळा देश शोकसागरात बुडालेला असला; तरी, त्या दुर्दैवी जीवांमधील कुणीही 'शहीद' वा 'हुतात्मा' म्हणून गणला जाऊ शकत नाही...जर, या दुःखद घटनेत 'शहीद-हुतात्मा' होण्यास कोण पात्र असेल; तर, तो एकमेव सय्यद आदिल हुसेन शाहच, ज्याच्याकडे तुम्ही लोक जाणिवपूर्वक अक्षम्य स्वरुपाचं दुर्लक्ष करताय आणि महन्मंगल 'हिंदुत्वा'ला काळीमा फासताय!**

....कुठे तो हुतात्मा 'सय्यद आदिल हुसेन शाह' आणि कुठे ते सदैव 'इलेक्शन-मोड'वर असणारे बेपर्वा 'अमित शाह'...!!!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# पुणे शहरातील ज्येष्ठ नेते श्रीकांत शिरोळे यांच्या फेसबुकच्या आधारे साभार

कै. बाळ फुले हा आमचा महाविद्यालयीन मित्रमंडळींपैकी एक. किरकोळ देहयष्टी परंतु अत्यंत उत्साही, प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक, संगीत कला क्षेत्रात विशेष रुची असणारा! आमचा दुसरा जिवलग मित्र विजय होले याची धाकटी भगिनी हिचे बरोबर संसार त्याने थाटला. आदरणीय लता मंगेशकर दीदीवर विशेष भक्ती! **मंगेशकर कुटुंबीयांवर असणारे भक्तीपोटी लता दीदीने निर्माण केलेले ''लेकीन'' चित्रपटात सहनिर्माता म्हणून केलेले साहस अंगाशी आले. सिने व्यवसायात झालेले आर्थिक नुकसान सहन न झालेने अकाली निधन झाले. त्याच्या अंतिम संस्काराला देखील मंगेशकर कुटुंब उपस्थित राहीले नव्हते. तेंव्हाच मंगेशकर कुटुंबीयांचा खरा चेहरा समोर आला होता.**

ज्या भूखंडावर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल उभे आहे, तो संपूर्ण भूखंड कै बाळ फुलेचे कुटुंबीयांचे मालकीचा. आजही सदर हॉस्पिटल मधील एका टीनपाट प्रवेशद्वारावर ''कै. बाळ फुले प्रवेशद्वार'' असा फलक आहे. ही मंगेशकर कुटुबियांची दानत!

शहरी कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत सदर भूखंड बाधित होता (अर्बन लॅन्ड सिलींग क्ट १९७६). सदर कायद्यात असणारे तरतुदीनुसार राज्य सरकारला सदर कायद्यातून सवलत देण्याचा अधिकार होता. महाराष्ट्र राज्यात तेंव्हा आदरणीय शंकररावजी चव्हाणसाहेब मुख्यमंत्री होते. तेंव्हा माननीय मुख्यमंत्री साहेबांना भेटून सवलत मागणारा अर्ज देणे आवश्यक होते. माझे आदरणीय शंकररावजी चव्हाणसाहेबांसोबत असणारे प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध जगजाहीर होते. ही माहीती हृदयनाथ तथा बाळासाहेब मंगेशकर यांना समजली. त्यांनी कै प्रतापराव तथा तात्यासाहेब गोडसे यांचे मार्फत माझेबरोबर संपर्क साधून 'लता दीदीला आदरणीय चव्हाणसाहेबांना भेटायचे आहे, तुम्ही ही भेट घडवून आणा' अशी विनंती केली. **मी चव्हाणसाहेबांना दीदींना आपली भेट हवी आहे, अशी विनंती केली. त्याला अनुसरून यथावकाश साहेबांसमवेत बैठक ठरली. मी दीदींचे पेडर रोडवरील निवासस्थानातून दीदी व बाळासाहेब मंगेशकर यांना घेऊन सकाळी नऊ वाजता वेळेवर वर्षावरील बंगल्यावर पोहोचलो. ठरलेल्या वेळेवर साहेबांसमवेत बैठक सुरू झाली चहापानानंतर दीदींनी पर्समधून एक अर्ज काढून साहेबांना बैठकीचे प्रयोजन सांगितल्यावर साहेबांनी सदर अर्ज सचिवांकडे द्यायला सुचविले. तेंव्हा दीदी किती मोठ्या गायिका किंवा कलाकार आहेत हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत असतांना आदरणीय चव्हाणसाहेब म्हणाले, ''मी प्रचलित कायद्यानुसार निर्णय करतो समोरील व्यक्ती कोण आहेत ? याच्याशी मला काही कर्तव्य नसते. जो नियम गरीब नागरिकाला तोच नियम तुम्हाला! आणि दीदींनी गाणी देशासाठी नव्हे तर, पैशासाठी गायली आहेत त्याचा या कायद्याशी काय संबंध आहे ?'' बैठक संपली. मी या नाट्याचा साक्षीदार आहे. बाळासाहेब मंगेशकर यांचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता.**

यथावकाश पुढे आदरणीय शरदराव पवारसाहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर लगेचच मंगेशकर कुटुंबियांनी पवारसाहेबांकडून आवश्यक ती सवलत मिळवून दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल उभे केले. कै बाळ फुले याला बाजूला केले ते कायमचेच! दरम्यान, विलासराव देशमुख यांच्यासह अनेक मुख्यमंत्री होऊन गेले. सर्वांकडून मंगेशकर कुटुंबियांनी अनेक वेगवेगळ्या सवलती उपटल्या. मात्र उद्घाटन अटलजी बाजपेई यांच्या हस्ते करतांना ना पवारसाहेबांना ना विलासराव देशमुख यांच्यासह कोणालाही आमंत्रण दिले नाही!

ही या कुटुंबाची वागण्याची पद्धत !

# “प्रथम नोटबंदी, मग ३७० कलम रद्द”...असे एकेक तथाकथित ‘जहाल’ उपाय योजून, दहशतवाद संपवल्याचे डांगोरे पिटणारे राजकीय-विदूषक, सध्या कुठे लपलेत...???

**गेल्या दहाबारा वर्षात शेकडो लोकं दहशतवाद्यांकडून मारली जात असतानाही; गोदी-मिडीयाकडून नेहमीप्रमाणेच बातम्या दाबल्या गेल्यामुळे, पर्यटक या विदुषकांच्या ‘बोलबचनगिरी’वर ‘अंधविश्वास’ ठेवत...मोठ्या संख्येने काश्मिरात जाऊ लागले आणि तिथेच घात झाला! टाळ्या आणि थाळ्या वाजवून ‘करोना’ला ‘गो बॅक’ करण्याच्या दर्जाचाच, हा ‘अंधविश्वास’ होता.**

...त्यातून, आलेला गाफिलपणा व सुरक्षेतली अक्षम्य शिथिलता-ढिलाई, डझनावरी पर्यटकांचे निष्कारण प्राण घेऊन गेली. एकीकडे तुटपुंज्या पगाराचे ‘अग्निवीर-गुलाम’ म्हणून अर्धप्रशिक्षित नवतरुण भरती करायचे आणि निवृत्त लष्करी अधिकारी जी. डी. बक्षी म्हणाले त्याप्रमाणे, १ लाख ८० हजार कायम जवान भरतीच करायचे नाहीत...परिणामतः, दोन हजाराहून अधिक पर्यटक असलेल्या ठिकाणी सुरक्षा-व्यवस्थाच मौजूद नव्हती; दुसर्‍या बाजुला, भाजपच्या आलतूफालतू नेत्यांच्या दिमतीला मात्र कायमच कडेकोट बंदोबस्त!

...सुरक्षेतील या शिथिलता-ढिलाईच्या जोडीला ‘पुलवामा’च्या वेळेप्रमाणेच, याहीवेळेस ‘इंटेलिजन्स फेल्युअर’ देशाच्या वायव्य सीमेवर टांगलं गेलं! तथाकथित भारतीय ‘जेम्स बाँड, शेरलॉक होम्स’ पुन्हा एकवार



कचकड्याचे बाहुले ठरले आणि हॅरी पॉटरच्या पुस्तकातली जादू शिकलेले पाकिस्तानी दहशतवादी, त्यांच्या डोळ्यादेखत आपला कार्यभाग साधून गेले...जगभर आपली छी: थू चाललीय, ती त्यामुळेच.

**पठाणकोट, पुरी, पुलवामा आणि आता पेहेलगाम...अशी या ‘पादरटां’ची ‘प’ ची लाजिरवाणी ‘बाराखडी’ अशीच न थांबता-थबकता सुरुच आहे. पठाणकोट हल्ल्यापासूनच सिंधूनदी-करार मोडण्याची (सध्या तो फक्त, ‘निलंबित’च ठेवलाय) व त्याद्वारे पाकिस्तानची कंबर मोडण्याची धमाकेदार पोकळ धमकीची भाषा, मागील पानावरुन पुढे चालूच आहे (पुरीच्या दहशतवादी हल्ल्याप्रसंगी तर, हीच धमकीची भाषा वापरणाऱ्या बड्या भाजपाई नेत्याने शब्द फिरवून सारवासारव केलेली, स्मरत असेलच वाचकांना)...** ना हे धड ‘लाल चीन’ला ‘लाल डोळे’ करुन दाखवणार (चीनने गलवान खोऱ्यातील आपला ४००० चौ. कि. मी. एवढा मोठा भूभाग बळकवलाय तरीही), ना पाकिस्तानला कायमचा धडा शिकवणार...मात्र, १९४८चा पाकिस्तानी हल्ला व १९६२चं चीनचं आक्रमण; यावरुन, कायमच पं. जवाहरलाल नेहरुंच्या नावाने मोठ्याने गळे काढून रडणार, आरडणार...वरुन निर्लज्जपणे बिहारच्या निवडणूक प्रचार सभेत हास्यविनोद करत रमणार! अवघा देश शोकसागरात बुडालेला असताना, भारतीय जनतेच्या भळभळत्या जखमेवर मीठ चोळण्याचे, हे कसले बेशरम चाळे चाललेत?

...लक्षात घ्या, आमचे छत्रपती शिवाजी महाराज, उण्यापुऱ्या पन्नासएक वर्षांच्या उभ्या हयातीत कधिच गाफिल राहिले नव्हते...कायम गाफिल राहिले, ते मोंगलच! मग, तुम्ही कोणाचा वारसा नेमका चालवताय...कशाला उठसूठ शिवछत्रपतींचे नाव घेता, त्यांच्या नखाची तर सर आहे का तुम्हा लोकांना...??

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

# प्राप्त झालंय तसं पुढे पाठवत आहे, जे ऐतिहासिक तथ्य आहे...

प्रिय देशवासीयांनो,

**विषय: ‘मोदींनी राजीनामा’ द्यावा**

१९६२ च्या हिवाळ्यात, २० ऑक्टोबर १९६२ रोजी सकाळी सुमारे ४ वाजता, चिनी सैन्याने थागला रेंज पार करुन भारतावर आक्रमण केले. भारत-चीन युद्ध सुरू झाले.

■ काही दिवसांतच ब्रिगेडियर दळवी चीनने ताब्यात घेतले आणि २६ ऑक्टोबर १९६२ रोजी राष्ट्रीय आणीबाणी घोषित करण्यात आली.

■ त्याच दिवशी, जनसंघाचे (भाजपचे पूर्वसूरी) राज्यसभेतील तरुण खासदार आणि त्यांचे चार सहकारी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांना भेटले आणि संसदेचं अधिवेशन तात्काळ बोलावण्याची मागणी केली.

■ त्या तरुण खासदाराचं नाव होतं अटल बिहारी बाजपेयी. त्यावेळी ते त्यांच्या तिशीत होते, तर पंडित नेहरु ७३ वर्षांचे होते. नेहरु हे जागतिक कीर्तीचे नेते आणि लोकशाहीवर दृढ विश्वास असलेले व्यक्तिमत्त्व होते.

■ नेहरुंनी युद्धाच्या किंवा देशातील शत्रुच्या घुसखोरीच्या संबंधाने स्वत:च्या जबाबदारीपासून पळण्याचा प्रयत्न केला नाही.

■ बाजपेयींच्या मागणीनुसार नेहरुंनी संसदेचं अधिवेशन ८ नोव्हेंबर १९६२ रोजी बोलावलं. ते सात दिवस चाललं आणि १६२ खासदारांनी निर्भीडपणे सरकारवर टीका केली. अगदी काँग्रेसचे खासदारही त्यांच्या सरकारवर टीका करण्यास मागे नव्हते. पंडित नेहरुंनी त्यांची मते शांतपणे ऐकली व त्यांचा सन्मान राखला.

■ लक्षात घ्या की, चिनी आक्रमण सुरू असतानाही, काही विरोधी खासदारांनी सत्ताधारी काँग्रेस सरकारवर कठोर टीका सुरुच ठेवली होती!

■ अशासमयी, नेहरुंनी बाजपेयींना चिनी-एजंट म्हणून हिणवले नाही किंवा त्यांच्यावर काही आरोप केले नाहीत... ना पोलीस, ना तपास यंत्रणा, ना अटक.



### आता २०२० च्या परिस्थितीकडे वळूया...

■ चिनी सैन्याने भारतावर आक्रमण करुन २००० चौरस मीटर भारतीय भूभाग बळकावला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यावर लबाडीने सांगितलं की, कोणीही आपल्या हद्दीत घुसलेलं नाही.

■ २०२० चा हा खोटारडेपणा २०२५ च्या पहिल्याच काही दिवसांत उघड झाला, जेव्हा परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी सांगितलं की, चीनने निर्माण केलेल्या दोन नवीन काऊंटीज भारतीय भूभागावर अधिकार सांगत आहेत.

■ पण दुर्दैवाने, आज भारतीय राजकारणात ना बाजपेयी उरले आहेत, ना नेहरु!

■ ‘मोदींचं मौन’ (खराखुरा ‘मौनीबाबा’) चीनला आणखी धाडसी बनवतंय. नरेंद्र मोदींनी संसदीय लोकशाहीच्या परंपरांचे कायम उल्लंघन केलेलं आहे. पण यावेळी, त्यांनी थेट ‘देशद्रोह’ केला आहे, असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही.

■ मोदींनी भारताच्या ‘प्रादेशिक अखंडते’शी तडजोड केलेली आहे.

**जय हिंद!**

कारणे म्हटली तर माहित असलेलीच आहेत. परकीय गुंतवणूकदार शेअर्सची जोरदार विक्री करत आहेत, भारतीय कंपन्या अपेक्षेप्रमाणे कामगिरी करत नाहीयेत, डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर त्यांनी जागतिक व्यापाराची, जागतिक अर्थव्यवस्थेची आपल्याला गेली ४० वर्षे माहीत असलेली घडी पार विस्कटवून टाकली आहे.

**शेअर मार्केटमधील सट्टेबाज, शॉर्ट टर्म गुंतवणूकदार सर्वात कशाला घाबरत असतील? ते अनिश्चिततेला जास्त घाबरतात. भविष्य धूसर किंवा अंधकारमय वाटल्यावर सर्वात सुरक्षित उपाय म्हणजे, शेअर्स विकून कॅशवर बसणे. हेच बरेचजण करू लागले आहेत.**

**पण शेअर्स कोसळण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण असते, त्याचे फुगलेले खरेतर फुगवलेले अवाजवी भाव. सांगितले जात होते भारतीय शेयर मार्केटचे स्नायू बळकट होत आहेत , त्यातील अर्धी तर सूज असू शकते**

शेअर्सच्या किमतींचा काही एक जैविक संबंध कंपन्यांच्या विक्री आणि नफ्याशी असला पाहिजे. ती नाळ तुटून शेअर्सचे भाव अवाजवी पातळीवर गेले की, तो फुगा फुटतोच फुटतो. आज नाही तर उद्या.

हे सर्वात जास्त झाले आहे मध्यम आकाराच्या आणि छोट्या आकाराच्या कंपन्यांमध्ये. त्यांना मिड कॅप आणि स्मॉल कॅप म्हणतात. मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांक अनुक्रमे २१ आणि २६ टक्क्यानी घसरले आहेत. म्हणजे सरासरी पेक्षा खूप जास्त.

अनेक मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकातील कंपन्यानी गेल्या एक-दोन वर्षात अव्वाच्या सव्वा प्रीमियम आकारून आयपीओ काढले होते. तो सारा फुगा फुटू लागला आहे.

**या मध्यम आणि छोट्या आकाराच्या कंपन्यांचे बिझनेस मॉडेल, त्या कंपन्यांमधील कॉर्पोरेट गव्हर्नन्सची गुणवत्ता, आकडेवारी बद्दल अपारदर्शीपणा आणि साशंकता आणि मर्चंट बँकर्सना हाताशी धरून शेअरचे चढवलेले मूल्यांकन.... काय चालले आहे सर्वांना माहिती होते.**

याला वेसण घालण्याची घटनादत्त जबाबदारी ज्या सेबी वर होती, ती मात्र सर्व काही मार्केट फॉर्सेसवर सोडून तोंडात तंबाखूची गुळणी करून बसली होती.

**सट्टेबाजानी आपापसात मारामाऱ्या करून एकमेकांचे रक्त काढले तर काही फरक पडत नाही. पण गेल्या काही वर्षात मध्यम आणि निम्न मध्यमवर्ग यांच्या हजारो कोटी रुपयांच्या बचती मोठ्या प्रमाणावर म्युच्युअल फंडा मार्फत शेअर मार्केटमध्ये गुंतवले जात आहेत. त्यातील अनेक मिडकॅप आणि स्मॉल कॅप मध्ये आहेत.**

पुढच्या एक दोन महिन्यात म्युच्युअल फंडांचे एन ए व्ही. नेट ॲसेट व्हॅल्यू. यायला लागतील त्यावेळेस चित्र अधिक स्पष्ट होईल.

शेयर मार्केट खाली जाते, मग काही काळाने वर जाते अशी शाळकरी मांडणी करणाऱ्या लोकांना; जपान मधील शेयर निर्देशांक अवाजवी भावांमुळे वाढला, मग आपटला आणि नंतर ३० वर्षे उठू शकला नव्हता

***...संजीव चांदोरकर***




भांडवलदारांना कुठला नसतो धर्म, नसतो कुठला 'देश'...त्यांना प्रिय असतो फक्त, रग्गड नफ्याचा 'धनादेश'! भांडवली-व्यवस्थेतून वेड्यावाकड्या अतिरेकी नफ्याची ओंगळवाणी-किळसवाणी प्रेरणा वेगळी काढणं, सर्वथैव अशक्य...मेल्या मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाणारीच केवळ ही जमात नव्हे; तर, भांडवली जीवनशैली व भांडवली अर्थव्यवस्थेतल्या कार्बन-ऊत्सर्जनातून जागतिक-तापमानवाढ व त्याद्वारे, अंततः सजीवसृष्टीचं पृथ्वीतलावरुन उच्चाटन घडवणारी ही 'जीवनविरोधी' अनैतिक जमात आहे!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

The great warrior of the 'Workers' Movement' in the capacity of a renowned pleader & leader...and, an ardent Environmentalist Mr. Sanjay Sanghavi passes away...a great loss and shock to the entire workers' fraternity!

His revolutionary legacy will be carried on and his outstanding contribution to the social and political field, shall ever remain unforgettable!

In this harsh hour, we stand firmly with his entire family and close friends....

...Rajan Raje

एक मार्क केलंत का...???

काँग्रेसच्या काळात असे दहशतवादी हल्ले झाले रे झाले की, सरकारला धारेवर धरलं जायचं, तावातावाने तारस्वरात जाब विचारले जायचे....

आता मात्र शेपूट घालून स्वतःच स्वतःच रक्षण कसे करावे, याचे

मार्गदर्शन केलं जातंय.

मोदी सरकार निष्क्रिय आहे आणि ते काहीही करु शकणार नाही, याची मनोमन खात्री, या नवहिंदुत्ववाद्यांना पटलीय... हेच यातून सिद्ध होतंय.

बाप छंदीफंदी असला की, मुलं त्याच्याकडून अपेक्षा न ठेवता स्वतःच लहान वयात पैसे कमावण्यासाठी बाहेर पडतात....तसंच काहीसं आहे हे!

(समाजमाध्यमातून साभार....)

# कपाळकरंटे कोण?

पाश्चिमात्यांची भाषा, खाणंपिणं, पेहराव, राहणीमान, पब संस्कृती यांचा प्रभाव आपण आवडीनं अंगवळणी पाडून घेतलाय. पण त्यांच्याकडून आपण जे शिकायला हवं होतं, ते म्हणजे तर्कशुद्ध विचार, कामाला प्रतिष्ठा, सार्वजनिक स्वच्छता, नियमांचे पालन करणे आणि स्वावलंबीपणा तेच नेमकं आपण दृष्टिआड केलं आहे.

**आपण लोकांचे नेमके दुर्गुणच का घेत असतो, सद्गुण का नाही? याचे ताजे उदाहरण म्हणजे, मुसलमान धर्मांध आहेत म्हणून आपणही धर्मांध होत चाललो आहोत. ते धार्मिक दहशतवाद वाजवतात म्हणून आपणही धार्मिक दहशतवाद माजवायला सुरुवात केली आहे.**

पण त्याचबरोबर ते हजारोंनी एकत्र येऊन शांततेने नमाज पढतात आणि देवाची करुणा भागतात. हा त्यांचा सद्गुण आपण न घेता, आपल्या देवळात मात्र आपण झांजा-घंटांचा ठाणाणा आवाज करत जोरजोराने आरत्या म्हणत असतो आणि प्रचंड ध्वनीप्रदूषण करत असतो. असे करून आपण आपला देव बहिरा आहे म्हणून त्याला जोराने आपले गाऱ्हाणे ऐकवणे क्रमप्राप्त आहे असे आपल्याला वाटते काय?

विकसित देशात सार्वजनिक मुताऱ्या एवढ्या स्वच्छ असतात की ती मुतारी आहे असे वाटत नाही. एवढेच काय पण त्यांची सहलीची ठिकाणेच नाही तर, जंगलेही स्वच्छ असतात. हे मी स्वानुभवाने ठामपणे सांगू शकतो. याउलट भारतात कुठेही जा सार्वजनिक मुताऱ्या म्हणजे नरक असतो. दुर्गंध असह्य झाल्यामुळे नाक मुठीत धरून केव्हा एकदा मोकळे होतो असे होऊन जाते. नाव मात्र 'स्वच्छतागृह' असते. किती विरोधाभास हा! आपली सहलीचे ठिकाणे तर प्लास्टिकच्या कचऱ्याने भरून वाहत असलेली दिसतात. जंगलातही अनेक ठिकाणी प्लास्टिकच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची वेष्टणे इकडे तिकडे पडलेली दिसतात. एकूण सगळीकडे कचरा करणे आणि घाण करणे हेच आपले वैशिष्ट्य राहिलेले आहे.

**पाश्चात्य रस्त्यांवर प्रत्येक गाडी लेन सिस्टीम पाळत असते आणि सिग्नल कधीही तोडताना दिसत नाहीत. रस्त्यावर चिटपाखरू नसतानाही, अगदी रात्री बारा वाजतासुद्धा! पादचाऱ्यांना तिथले गाडीवाले प्राथमिकता देत असतात. ते रस्ता ओलांडेपर्यंत शांतपणे थांबतात अगदी कितीही महत्त्वाचे काम आणि घाई असली तरीही!** ...आणि आपल्याकडे काय परिस्थिती असते? एक तर आपण कधीही लेन सिस्टीम पाळत नाही. सिग्नल तोडणे हा आपल्या अभिमानाचा विषय असतो. एक दिशा मार्ग असेल तर, उलट दिशेने गाड्या नेणे, चालत्या दुचाकी वर मान वाकडी करून फोनवर बोलणे आणि पादचाऱ्यांच्या अगदी अंगाजवळून गाडी नेत त्यांना घाबरवणे हे आपले कर्तृत्व असते. एकंदरीत आपल्याला सगळ्याचीच घाई झालेली असते, पण काम मात्र कवडीचे नसते.

**सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, देवाधर्माच्या बाबतीत आपण खूपच संवेदनाशील आहोत, ते योग्य. पण मुसलमान आणि ख्रिश्चनांची प्रार्थनास्थळे जेवढी स्वच्छ असतात त्याच्या पार्श्वभूमीवर आपली देवळे जळमटांनी भरलेली असतात आणि प्रचंड अस्वच्छ असतात. असे का? चर्चमध्ये तर लोक पायात चप्पल घालून जातात; तरीही तिथे कुठेही घाण नसते, धूळ नसते... असते ती फक्त शांतता. अशी शांतता आपल्या देवळात का असत नाही? का सतत नुसता गोंगाट असतो? अशा देवळांमध्ये जाऊन आपल्याला खरंच मन:शांती मिळते काय?**

एवढे सगळे दुर्गुण आपल्या अंगात असूनही आपण परधर्मीयांना तुच्छ लेखतो आणि स्वतःची संस्कृती उच्च समजतो! याला दांभिकपणा म्हणायचे नाही तर काय?

*– जगदीश काबरे*

# करार आणि बेकरार

पर्यटकांच्या हत्या झाल्या,
बदला म्हणून
मुसलमानांवर आर्थिक बहिष्काराची भाषा सुरु झाली.
एक रुपयाची पण खरेदी त्यांच्याकडून करु नका.
त्यांना वठणीवर आणा.
भक्तांच्या ग्रुपवर मेसेजेसचा पूर आला......
अरे भक्तांनो,
जेव्हा, हल्ला झाला
तेव्हा, मोदीसाहेब सौदी अरेबियात होते.
सौदी नामक मुस्लिम देशाबरोबर व्यापारी करार करत होते......
भारत आणि सौदीचा वार्षिक व्यापार ४३ बिलियन डॉलर्सचा आहे........
ती उलाढाल वाढावी म्हणून भक्तांचा बाप प्रयत्न करतोय.
आणि
भक्तुल्ले इथल्या स्थानिक मुसलमानांवर डोळे वटारतात...........
उल्हास नावाच्या आमच्या मित्राची कोकणात आंब्याची बाग आहे.
सगळी बाग कराराने उस्मान नावाच्या व्यापाऱ्याला दिली आहे.
उस्मान देखभाल करतो
उस्मानच आंबे विकतो.
उल्हास तंगड्या वर करून पैसे घेतो.
मला सांगा
उल्हासच्या बागेतील आंबे कोणाचे ??
उस्मान कडून आंबे घेऊ नका
मग काय
उल्हास डोक्यावर पेटी घेऊन आंबे विकेल ??....

दुबईतील तथाकथित मसाला किंग धनंजय दातार !
त्याच्या कंपनीचे नाव
अल आदिल
अल म्हणजे अल्ला !!
भक्तांनी दातार शेठला सल्ला द्यावा : दुबईतील धंदा बंद करुन ये आणि भारतात गोशाळा काढ....
भक्तांना विचारा,
दातारने दुबईत दिऱ्हाम कमावलेले चालतात
पण,
गरीब मुस्लिमाने भारतात पोट भरु नये...???
जुन्या काळापासून अरबांशी भारताचा व्यापार आहे.....
भारतात येणाऱ्या अरबी व्यापाऱ्यांसाठी,
जगातील दुसरी मशीद केरळच्या राजाने बांधली...
महाराज अरबी घोडे अरबी व्यापाऱ्यांकडून घेत....
रिलायन्स इंडस्ट्रीजच्या बोर्डावर सौदीचा मुस्लिम राजकुमार आहे......
त्याची गुंतवणूक मुकेशभाईला चालते...???
पण
स्थानिक मुसलमानांकडून पाव, खारी, बटर घेऊ नका....
सौदीतून आलेल्या पेट्रोलवर आपल्या गाड्या चालतात.
आता त्या गाड्यांत गोमूत्र भरूया....
ॲपल कंपनीची काही टक्के मालकी सौदी घराण्याकडे आहे
म्हणून....
आयफोन वापरणं बंद करुया !
वोक्हार्ट, विप्रो, सिप्ला या भारतीय औषध कंपन्यांचे मालक मुसलमान आहेत.
त्यांची औषधं घेणं बंद करुया.
देशी गाईचं शेण खाऊन रोग बरा होईल...???
लक्षात ठेवा...
स्थानिक भारतीय मुसलमानांना छळू नका.
त्याचे परिणाम फार भयानक होतील.
लाखो भारतीय गल्फ देशांमध्ये नोकरी करतात.
त्यांना धोक्यात आणू नका.
तळटीप :
शेठ करार करतोय
नी
भक्त बेकरार झालेत.
सखोल तळटीप :
द्वेष पेरलात तर द्वेषच उगवणार...
सहज जाता जाता :
याआधी काळात 'काश्मीर की कली' चित्रपट हिट झाला
आताच्या काळात 'काश्मीर की बरबादी' हिट होतोय...

*– ऊडी. उषा*

# चीनकडून बरेच काही शिकण्यासारखे....

चीन डोनाल्ड ट्रम्प यांच्या नाकात दम आणू शकत आहे; कारण, त्याने गेली किमान दहा वर्षे अशी काही वेळ येणार, याचा अंदाज बांधत त्यासाठी होमवर्क केले आहे...

अमेरिकेची चीनबरोबर आयात निर्यात व्यापारातील तूट हा डोनाल्ड ट्रम्प यांचा गाभ्याचा मुद्दा. ती कमी करण्यासाठी ते वाट्टेल त्या थराला जात आहेत. पण, इतिहासात डोकावले तर असे दिसते की, अमेरिकेची युरोप आणि जपानशीदेखील अशी तूट होती; १९६०–७० दशकात युरोपबरोबर आणि १९८०–९० मध्ये जपान बरोबर...

१९७१ मध्ये रिचर्ड निक्सन यांनी डॉलरचा विनिमय दर सोन्यापासून तोडून युरोपला वठणीवर आणले आणि अशाच बिगर आर्थिक क्लुप्त्या वापरुन नंतर जपानला. युरोप आणि जपानने अमेरिकेचे ऐकले; कारण, ते लष्करी संरक्षणाबाबत अमेरिकेच्या छत्रछायेखाली अवलंबून होते...अजूनही आहेत.

चीनबरोबर यापैकी कोणत्याही हात पिरगळण्याच्या टॅक्टीज चालू शकत नाहीत. कारण चीन लष्करीदृष्ट्या स्वयंपूर्ण आणि सामर्थ्यवान आहे.



**चीनमध्ये दंगली होत नाहीत...ज्यामुळे, दुभंगलेली मने साधायला दोनतीन पिढ्या खर्ची पडतात.**

**चीन डोनाल्ड ट्रम्प यांना आव्हान देऊ शकत आहे; ते ह्या ताकदीवर...कोणाची छाती किती इंच, कोण किती उच्चरवात धमक्या देते, याचा काहीही संबंध नसतो.**

**२०१५ च्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पहिल्यांदा चीनला भविष्यात अमेरिका आपली कोंडी करु शकते याची ठोस जाणीव झाली आणि चीनने दशकभर पद्धतशीरपणे त्यावर उपाययोजना केल्या**

चीनच्या एकूण निर्यातीपैकी अमेरिकेला केल्या जाणाऱ्या निर्यातीचा वाटा कमी करत, आता १३ टक्क्यांवर आणला. अमेरिकेच्या कर्जरोख्यांमध्ये चीनच्या गुंतवणुकीचे प्रमाण दोन तृतीयांशवर आणले. अमेरिकेने चीनला तंत्रज्ञान देण्याबाबत निर्बंध आणले गेल्यानंतर चीनने नवीन तंत्रज्ञान विकासामध्ये प्रचंड सार्वजनिक पैशातून गुंतवणुकी केल्या

**अमेरिकेचे चीन बरोबर सुरू असलेले युद्ध फक्त, आयात करांबाबत नाही. आयात–कर एक फ्रंट आहे, झगडा प्रभुत्ववादाचा आहे.**

त्याच जोडीला चीनने आपले लष्करी सामर्थ्य वाढवले. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह मार्फत अनेकानेक राष्ट्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकी केल्या. निर्यातीपेक्षा देशांतर्गत मार्केटवर भर देण्यास सुरुवात केली. चीनचे सरकार आणि चीनची केंद्रीय बँक व्याजदर, विनिमय दर इत्यादी बाबतचे निर्णय एकत्रितपणे घेतात.

सर्वात महत्वाचे चीनमध्ये दंगली होत नाहीत...ज्यामुळे, दुभंगलेली मने साधायला दोनतीन पिढ्या खर्ची पडतात.

चीन डोनाल्ड ट्रम्प यांना आव्हान देऊ शकत आहे; ते ह्या ताकदीवर...कोणाची छाती किती इंच, कोण किती उच्चरवात धमक्या देते, याचा काहीही संबंध नसतो.


***...संजीव चांदोरकर***

# सैयद हुसेन शाह एक काश्मिरी शेर

**हा आहे सैयद हुसैन शाह....‘पहेलगाम’मध्ये पर्यटकांना घोड्यावर फिरवण्याचं काम करणारा!**

**दहशतवादी हल्ला झाला, तेव्हा त्याने हे आपले पाहुणे आहेत... ‘‘या ‘मासूम’ पर्यटकांना मारु नका’’, अशी कळवळून विनंती दहशतवाद्यांना केली....**

पण, तरीही दहशतवादी ऐकत नाहीत म्हटल्यावर, सैय्यद दहशतवाद्यांच्या अंगावर चालून गेला आणि त्यांच्या हातातली रायफल हिसकावण्याचा प्रयत्न केला...याच प्रयत्नात दहशतवाद्यांनी सैय्यद हुसेन शाहची गोळी मारुन त्याची हत्या केली!



**पहेलगामच्या मृतांमधला हा ही एक ‘‘काश्मिरी शेर’’...गुलाम नबी नावाचा दुसरा घोडेवाला या दु:खद प्रसंगी एवढंच म्हणाला की, ‘‘आमच्या एका सहकार्याने, कालपरवा नुकतीच ओळख झालेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी आपला जीव कुर्बान केला... आम्हाला सर्वांना त्याचा रास्त अभिमान आहे!’’**

...हिंदू बांधवांना वाचवण्यासाठी अतिरेक्यांवर झडप घालून, त्यांची रायफल हिसकावण्याच्या प्रयत्नात ‘शहीद’ झालेल्या ‘सैय्यद हुसेन शाह’, या जिगरबाज वाघाच्या ‘शहादती’ला त्रिवार सलाम!

**कुठे तो जिगरबाज देशभक्त ‘सैय्यद हुसेन शाह’ आणि कुठे ते बेजबाबदार–बेफिकीर देशद्रोही ‘अमित शाह’!**

१ लाख ८० हजार नियमित सैनिक भरती रोखून... तुटपुंज्या पगारावर अर्धप्रशिक्षित ‘अग्निवीर–गुलाम’ भरती करण्याचा ‘देशद्रोह’ कुणी केला? ६ वर्षांपूर्वी ‘पुलवामा’ हत्याकांडात ४७ CRPF जवान शहीद झाले होते... तेव्हाही कारण तेच! दहशतवाद्यांकडून हल्ला होण्याची संभाव्य शक्यता दिसत असूनही बेफिकिरीने व बेजबाबदारपणे त्यांना ‘हेलिकॉप्टर–सेवा’ नाकारली गेली होती, म्हणूनच ते दुर्दैवी हत्याकांड घडलं...विशेष म्हणजे, दोन्ही हत्याकांडाची ‘पूर्वसूचना’ प्राप्त करण्यात तथाकथित ‘भारतीय जेम्स बाँड’ची R-W आणि IB सपशेल अपयशी ठरली!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**